## शेकाप चिटणीसपदी अस्लम राऊत



**माणगाव :** माणगाव तालुका शेतकरी कामगार पक्षाची बैठक रविवारी (दि.२६) कृषी उत्पन्न बाजार समिती माणगाव येथील सभागृहात पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा राजिपचे माजी समाज कल्याण सभापती अशोक गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाली. या बैठकीत आगामी निवडणुकांचा विचार करता माणगाव तालुक्यात पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी तालुका शेकाप पान २ वर

कृषीवल
रायगड, बुधवार, दि. २९ मे २०२४
किंमत ४ ₹




**आजचा अग्रलेख**
**महायुतीतील धुसफूस**

**वे|ध|क**

### धारावीत इमारतीला आग, सहाजण जखमी

**मुंबई :** धारावी येथील ९० फीट रोडवरील अशोक मिल कंपाऊंड नजीकच्या तीन मजली इमारतीला मंगळवारी पहाटे चारच्या सुमारास आग लागली. या दुर्घटनेत एकूण सहाजण जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दुर्घटनेचे वृत्त समजताच अग्निशमन दलाचे जवान, १०८ रुग्णवाहिका आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मदतकार्य हाती घेतले. विद्युत तारांच्या संपर्कात आल्याने आगीचा डोंब उसळला. या भडक्यात इमारतीतील लाकडी सामान पूर्णपणे पान ५ वर

### जितेंद्र आव्हाड करणार मनुस्मृतींचे दहन

**मुंबई :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, ‘एससीईआरटी’ने राज्याच्या शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीमधील काही श्लोकांचा समावेश करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी याला कडाडून विरोध केला आहे. त्यासाठी जितेंद्र आव्हाड बुधवारी महाड येथे जाऊन मनुस्मृतीची होळी करणार आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथेच मनुस्मृतीची होळी केली होती. ही बाब लक्षात घेत सरकारचा निषेध करण्यासाठी जितेंद्र आव्हाड देखील महाड येथेच मनुस्मृतीची होळी करणार आहेत. मनुस्मृतीमधील तीन श्लोकांचा अभ्यासक्रमात पान ५ वर

# कर्जतमध्ये शीतयुद्ध ?

**भाजपचे शिंदे गटावर आरोप | प्रति आळंदी, पंढरपुर उभारले स्मशानभूमीच्या जागेवर**

**| कर्जत | वार्ताहर |**

**नगर परिषद हद्दीत प्रति आळंदी व पंढरपूर उभारण्यात आले आहे. पांडुरंगाची मूर्ती बसवण्यात आली आहे. त्या मूर्तीचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले होते. ज्या जागेवर ही ५१ फूट उंचीची मूर्ती बसविली आहे. ती जमिन स्मशानभूमीची आहे, असा गौप्यस्फोट भाजपचे कार्यकर्ते ॲड. ऋषिकेश जोशी यांनी पत्रकार परिषदेत केला आहे.**



जोशी यांनी याबाबतचे थेट आरोप स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांच्यावर केले आहेत. त्यामुळे भाजपा आणि शिंदे गटात शीतयुध्द सुरु असल्याचे त्या निमित्ताने अधोरेखित होते. ब्राह्मण सभा सभागृहामध्ये भाजप कार्यकर्ते ॲड. ऋषिकेश जोशी यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी ते बोलत होते. मौजे कर्जत येथील श्रीराम पुलानजीक पांडुरंगाची ५१ फूट मूर्ती उभारण्यात आली असून उपलब्ध झालेली कागदपत्र पाहता या ठिकाणी मूर्ती उभारताना जिल्हा पुतळा समितीची परवानगी घेण्यात आली होती का? तसेच या प्रकल्पाला पाटबंधारे खात्याची परवानगी आहे का? सदर मुर्ती भंग पावली, तर जबाबदारी कोण घेणार? जर ही जागा शासनाची असेल तर ज्या विभागाची आहे, त्यांची परवानगी नगरविकास खात्याने घेतली आहे का? जर खासगी व्यक्तीची असेल तर खासगी व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून परवानगी घेतली आहे का? याची चौकशी करून तत्कालीन नगर परिषद मुख्याधिकारी पंकज पाटील यांचे तात्काळ निलंबन करून विभागीय चौकशी प्रस्तावित करावी. तसेच पुतळा उभारणी संबंधीचे शासनाचे निकष पाळले आहेत का? याची माहिती घेऊन धार्मिक भावना दुखावणे व अधिकार पदाचा गैरवापर करून शासनाच्या पैशांचा अपव्यय करणे बाबत तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जोशी यांनी केली.

हे बांधकाम बेकायदेशीर आढळून आल्यास शासनाचा पैसा हा प्रस्ताव सादर करणारा व्यक्ती आणि मुख्याधिकारी यांच्या पगारातून वसूल करण्यात यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कर्जत येथे श्रीराम पुलानजीक शासनाच्या निधीचा वापर करून प्रति आळंदी व पंढरपूर या नावाने विकासकाम करण्यात आले आहे. सदर मूर्ती ही हिंदू समाजाच्या चालीरितीनुसार उभारण्यात आली नाही. भाविकांना दक्षिण दिशेला या मूर्तीला नमस्कार करण्यास भाग पाडले जाते. या मूर्तीवर छत्र नाही. या मूर्तीशेजारी नदी असून ती पुर नियंत्रण रेषेच्यानजीक येत आहे. ही मूर्ती जर पुरात वाहून गेली अथवा वादळवाऱ्यात भंग झाली आणि सामाजिक भावना दुखवल्यास जबाबदार कोण? असा प्रश्नही उपस्थित केला आहे.

मूर्ती उभारण्यास जबाबदार शासकीय पान ५ वर

**डोंबिवली स्फोट प्रकरण**

## समिती गठीत, तीन आठवड्यांची मुदत

**| दिलीप जाधव |**
**| मुंबई |**

नुकताच डोंबिवली येथे एमआयडीसीतील कंपनीत भीषण स्फोट झाला. याप्रकरणी प्रधान सचिव उद्योग, प्रधान सचिव कामगार आणि प्रधान सचिव पर्यावरण यांची उच्च स्तरीय समिती नेमली आहे. ते तीन आठवड्यात अहवाल सादर करणार असून कंपनीचा आढावा घेणार आहेत. ज्या कंपनीने नियमांचे उल्लंघन केले आहे किंवा अनधिकृत बांधकाम पान ५ वर

**गेलचा अपूर्ण प्रस्ताव**

उदय सामंत पुढे म्हणाले की काही दिवसांपूर्वी आरोप करण्यात आला कि, गेल कंपनी महाराष्ट्रातून निघून गेली. त्याला सरकार जबाबदार आहे. मात्र, गेल कंपनीने त्याचे खापर आमच्यावर फोडू नये. गेल कंपनीने महाराष्ट्र सरकारकडे परिपूर्ण प्रस्ताव दिलाच नव्हता. त्यांनी रत्नागिरीमध्ये जागा मागितली होती. त्यावेळी एमआयडीसीकडे जागा उपलब्ध नव्हती. जेव्हा उपलब्ध झाली, तेव्हा त्यांनी रिफायनरी पाहिजे की नाही हे नीट सांगितले नाही. त्यामुळे त्यांनी पुढे प्रस्ताव दिलाच नाही.



## कोकण समृद्धी मार्गाला गाजर!

**| माणगाव | सलीम शेख |**




मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम गेली १४ वर्ष रखडले असून सद्यःस्थितीत या महामार्गाच्या कामाची रखडपट्टी अद्यापही सुरू आहे. राज्यातील महत्वाचा विदर्भातील समृद्धी महामार्गाचे काम जलदगतीने पूर्ण झाले. मात्र कोकणच्या विकासाचा मुंबई- गोवा महामार्ग वर्षोनुवर्षे रखडला असल्याने कोकणवासीयांचे दुखणे कायम राहिले आहे. सरकारने अनेकवेळा महामार्गाचे काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. ती आश्वासने हवेतच विरली. त्यामुळे आजही कोकणच्या समृद्धीचा मार्ग खडतरच राहिला. याकडे राज्यकर्त्यांनी दुर्लक्ष केले आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर सातत्याने होणारे लहान-मोठे अपघात तसेच या अपघातांतून अनेकांचे जाणारे जीव व अनेकांना आलेले कायमचे अपंगत्व पाहता हा महामार्ग जणू काही मृत्यूचा सापळाच बनला होता. गेल्या १४ वर्षांपूर्वी पळस्पे ते इंदापूर या पान ५ वर

### ॲड. सरोदे बाजू मांडणार

**महाड :** शिरगांवचे सरपंच सोमनाथ ओझर्डे यांनी आमदार भरत गोगावले यांचे सुपुत्र विकास गोगावले यांच्याकडून आपल्यावर गोळीबार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याबाबतची तक्रार महाड शहर पोलिस ठाण्यात दाखल केली होती. या गुन्ह्याच्या तपासाअंती पोलिसांनी जो क्लोजर रिपोर्ट पाठवला आहे. त्याला ओझर्डे यांच्यावतीने नामांकित वकील ॲड. असीम सरोदे यांनी आव्हान देत या प्रकरणाची पान ५ वर

### स्थानिकांच्या विरोधानंतर सिडकोचे पथक माघारी- बाळाराम पाटील

**| पनवेल | वार्ताहर |**

कळंबोली गावातील स्थानिक प्रकल्पग्रसतांच्या घरांवर कारवाई करण्यासाठी आलेल्या सिडकोच्या अतिक्रमण विभागाला स्थानिकांच्या विरोधाचा सामना करावा लागल्याने सिडकोच्या पथकाला कारवाई न करताच हात हलवत माघारी फिरावं लागलं आहे. मंगळवारी (दि.२८) करण्यात आलेल्या या विरोधावेळी स्थानिक गावकऱ्यांसोबत माजी आमदार पान ५ वर




**पुणे अपघात प्रकरण**

### दडपण्याचा राज्य सरकार प्रयत्न

**मुंबई :** राज्यात सध्या दुष्काळाचा प्रश्न गंभीर आहे. तर दुसरीकडे दारू आणि ड्रग्जचे सेवन करुन सर्वसामान्य लोकांना गाडीखाली चिरडण्याचे प्रकार वाढत आहेत. नागपूर, जळगाव व पुण्यात अशा घटना घडल्या पण अत्यंत संताप आणण्याचा प्रकार म्हणजे यातील गर्भश्रीमंत आरोपींना तातडीने जामीन कसा मिळेल, यासाठी पान ५ वर



# पनवेलचा दहावीचा निकाल ९७.७६टक्के

## दहावीच्या निकालात गतवर्षीपेक्षा एका टक्क्याने झाली वाढ

### ■ ६९ विद्यालयांचा निकाल १०० टक्के

**। पनवेल । वार्ताहर।**

विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे लक्ष लागून राहिलेल्या राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षेचा निकाल सोमवारी (दि. २७ मे) जाहीर झाला आहे. पनवेल तालुक्यात यंदा इयत्ता दहावीचा निकाल ९७.७६ टक्के लागला आहे. मागील वर्षी पनवेलचा दहावीचा निकाल ९६.५३ टक्के इतका लागला असून यावर्षी एका टक्क्याने वाढ झाली आहे. बारावीपाठोपाठ दहावीच्या निकालातही पनवेलमधील विद्यार्थ्यांनी बाजी मारली आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत मार्च २०२४ मध्ये घेण्यात येणारी दहावीची लेखी परीक्षा १ मार्च ते २६ मार्च या कालावधीत पार पडली. पनवेल तालुक्यातून १२५२४ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यापैकी १२४९६ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. यामध्ये ४१७२ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले. तर ४९७३ विद्यार्थी प्रथम श्रेणी, २५५८ विद्यार्थी द्वितीय श्रेणी गुण प्राप्त करुन उत्तीर्ण झाले.

तसेच या परिक्षेत पनवेल तालुक्यातील ५१४ विद्यार्थी काठावर पास झाले आहेत.

परीक्षेला बसलेल्या एकूण १२४९६ विद्यार्थ्यांपैकी १२२१७ विद्यार्थी यंदा पास झाले आहेत व २७९ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत. त्यानुसार पनवेल तालुक्याचा दहावी परीक्षेचा एकूण निकाल ९७.७६ टक्के इतका लागला आहे. १२वीचा निकाल लागल्यावर १०वीचा निकाल कधी लागणार याबाबत विद्यार्थी, पालकांसह अनेकांना प्रतीक्षा होती. अखेर सोमवारी दहावीचा निकाल लागला असून पनवेलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

# मोर्बा एस. एस. हायस्कूलचा दहावी परीक्षा निकाल ९७.७९ टक्के

**। माणगाव । वार्ताहर ।**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी शाळांत परीक्षेचा निकाल सोमवार दि. २७ मे २०२४ रोजी ऑनलाईन जाहीर झाला. या परीक्षेत माणगाव तालुक्यातील मोर्बा येथील मोर्बा सोशल सोसायटीच्या एस. एस. हायस्कूल मोर्बा या शाळेच्या उर्दू व मराठी माध्यमाचा मिळून एकूण निकाल ९७.७९ टक्के इतका लागला असून शाळेने आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या शाळेत उर्दू माध्यमातून सिमरन शादूलखान पठाण या विद्यार्थिनीने ९४.२० टक्के इतके गुण संपादन करून प्रथम क्रमांक मिळविला असून मराठी माध्यमातून योगिता दिनेश डोंगरे या विद्यार्थिनीने ८४ टक्के इतके गुण संपादन करून प्रथम क्रमांक मिळविला आहे.

या शाळेत उर्दू माध्यमातून उमेमा अ. अजीज राऊत ९२.२० टक्के इतके गुण संपादन करून द्वितीय क्रमांक, मेहरोझ अकबर अली गंगरेकर या विद्यार्थिनीने ९० टक्के इतके गुण संपादन करून तृतीय क्रमांक पटकावला आहे. तर मराठी माध्यमातून सलोनी संदीप इंगळे या विद्यार्थिनीने ८१.८० टक्के इतके गुण संपादन करून द्वितीय क्रमांक मिळविला असून स्नेहल राजेंद्र मोरे या विद्यार्थिनीने ८०.८० टक्के इतके गुण संपादन करून तृतीय क्रमांक पटकावला आहे. या शाळेमधून यावर्षी दहावी परीक्षेसाठी एकूण १३६ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. या शाळेचा निकाल दरवर्षी नेत्रदीपक लागत असल्याने पालकवर्गांमधे तसेच विद्यार्थ्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण आहे.यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. सैफुद्दीन धनसे,सचिव अस्लम राऊत, सहसचिव कादिर इब्राहिम हर्णेकर, शाळा समिती चेअरमन हुसैन हर्णेकर, संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच शाळेचे मुख्याध्यापक खालिद अहंमद रशीद खान, पर्यवेक्षिका समुनिसा गंगरेकर, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी असफ पल्लवकर, यांनी विशेष अभिनंदन शुभेच्छा दिल्या.

# ‘यशवंत’चा मृदूल घाटे पोलादपूर तालुक्यात सर्वप्रथम

## तालुक्यातील शाळा आणि विद्यार्थ्यांचे उज्वल यश

**। पोलादपूर । वार्ताहर ।**

पोलादपूर तालुक्यातील १२ शाळांनी १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली.पोलादपूर शहरातील यशवंत इंग्लिश मिडीयम स्कूलचा मृदूल घाटे याने ९५.२० टक्के गुण मिळवित प्रशालेसह तालुक्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.

रयत विद्यामंदिर पोलादपूरचा प्रणव धायगुडे ९३.२० टक्के मिळवून प्रथम आला आहे.श्री शंकरराव गोपाळराव महाडिक इंग्लिश मिडियम शाळेचा सलग नवव्या वर्षीसुध्दा १०० निकालाची परंपरा कायम ठेवली असून ओम मोरे ९२ टक्के प्रथमआला आहे. साने गुरुजी विद्यालय, लोहारे या प्रशालेचा सार्थक उतेकर ९२ टक्के प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला.

माध्यमिक विद्यालय सवादमधील आर्णा पाटेकर ८९.६० टक्के प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली. हाजी अली आदम अनवारी हायस्कूल वावे येथील सायमा मुदस्सर तांबे ८४.४० टक्के प्रथम आली. वरदायिनी माध्यमिक विद्यालय कापडे बुद्रुक येथे कुणाल हिंदूराव पिंजारी ९१.८० टक्के प्रथम,अक्षदा मंगेश धर्माधिकारी ९१.४० टक्के द्वितीय, भरत धाऊ ढवळे ९८.२० टक्के तृतीय, सृष्टी संदेश सलागरे ८८.६० टक्के चतुर्थ आणि आकाश संतोष सालेकर ९७ टक्के पाचव्या क्रमांकाने प्रशालेमध्ये उत्तीर्ण झाले. नरवीर तानाजी मालुसरे माध्यमिक विद्यालय देवळेमध्ये तेजस सखाराम पवार ८५.८० टक्के गुण मिळवून प्रथम आला आहे.

# कर्जत तालुक्यात नेरळची श्रुती झांजे प्रथम

## तालुक्यातील १७ शाळांचे निकाल १०० टक्के

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

दहावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला असून नेहमी प्रमाणे अनेक शाळांनी आपली १०० टक्के विद्यार्थी पास होण्याची परंपरा कायम राखली आहे. नेरळ येथील विद्या विकास मंदिर शाळेची श्रुती झांजे हि विद्यार्थिनी ९६. टक्के गुण मिळवून कर्जत तालुक्यात पहिली आली आहे.कर्जत शहरातील शारदा विद्यालयाचा विद्यार्थी ओम आनंद जाधव हा तालुक्यात दुसरा तर नेरळच्या एल.ए.इ.एस शाळेची विद्यार्थिनी स्नेहा मसने तालुक्यात तिसरी आली आहे. दरम्यान कर्जत तालुक्यात ४७ शाळांपैकी १७ शाळांचे निकाल १०० टक्के लागला.

नेरळ येथील विद्या विकास मंदिर शाळेची विद्यार्थिनी श्रुती झांजे हि ९६. ६० टक्के गुण मिळवून पहिली आली आहे. तर त्या शाळेत स्वानंदी संतोष मगर हि ९४. ४० टक्के गुण मिळवून दुसरी तर प्रज्वल पांडुरंग पवार हि विद्यार्थिनी ९३. टक्के गुण मिळवून तिसरी आली आहे या शाळेचा निकाल १०० टाकेन लागला असून हि या शाळेची सलग १३ वर्षांपासूनची परंपरा आहे. कर्जत येथील शरद मंदिर शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून तेथे ओम जाधव हा विद्यार्थी ९५. टक्के गुण मिळवून शाळेत पहिला आला आहे. तर केतकी श्रीखंडे ९३. टक्के गुण मिळवून दुसरी आणि सृष्टी पाटील ९३ टक्के गुण मिळवून तिसरी आली आहे. नेरळ येथील एल ए इ एस शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून तेथे स्नेहा मसने हि विद्यार्थिनी ९५ टक्के गन मिळवून पहिली आली आहे तर असितेश कांबळे ९४. टक्के गुण मिळवून दुसरा आणि माहीन तांबोळी तसेच बिपीन भंडारी हे दोघे ९४. टक्के गुण मिळवून तिसरे आले आहेत. नेरळ विद्यामंदिर शाळेचा निकाल ९८ टक्के लागला आहे तेथे राज जाधव हा ९१. टक्के गुण मिळवून पहिला तर प्रथमेश म्हसे ८८. टक्के गुण मिळवून दुसरा आणि जयदीप घाडगे ८७. टक्के गुण मिळवून तिसरा आला आहे. डिकसळ येथील शारदा इंग्लिश मिडीयम शकुल चा निकाल १०० टाकेन लागला असून तेथे सोनिया घारे हि ९२ टक्के गुण मिळवून प्रथम तर सोहं लोंगले ८७. टक्के गुण मिळवून दुसरा आणि भार्गवी पालकर ८५. टक्के गुण मिळवून तिसरे आली आहे. कशेळे येथील भाऊसाहेब राऊत शाळेत भूमी घरत ९१४० टक्के गुण मिळवून पहिली तर भैरवी मते ९०. टक्के गुण मिळवून दुसरी आले आहेत. गीता घारे इंग्लिश मिडीयम स्कुलचा निकाल १०० टक्के लागला असून हर्षदा जाधव ९१. टक्के गुण मिळवून पहिली ,तर सानिया देशमुख ९०. टक्के गुण मिळवून दुसरी आणि भक्ती कदम ८८. टक्के गुण मिळवून तिसरी आली आहे.मधुरम चॅरिटेबल ट्रस्ट आदिवासी आश्रमशाळा माणगांववाडी शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून तेथे विवेक वसंत होला ६९. ४० % हा प्रथम तर तनुजा चंद्रकांत सांबरी तसेच रेणुका लक्ष्मण केवारी ६७. ८० टक्के गुण मिळवून दुसरे आणि करण भगवान निरगुडे हा ६५. ८० टक्के गुण मिळवून तिसरा आला आहे.

कर्जत तालुक्यात ४७ माध्यमिक शाळांमधॅल तब्बल ३१८३ विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली आणि त्यातील ३०२३ विद्यार्थी हे दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. तालुक्यातील १७ माध्यमिक शाळांचे निकाल १०० टक्के लागले आहेत.

# विठ्ठलवाडी -राजखलाटी विद्यालयाच्या उज्वल निकालाची परंपरा कायम

**। खांब । वार्ताहर ।**

नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित न्यू इंग्लिश स्कूल विठ्ठलवाडी -राजखलाटी विद्यालयाच्या इ.१० वी बोर्ड परीक्षेच्या उज्वल निकालाची परंपरा या ही वर्षी कायम राखून विद्यालयाचा एकूण निकाल ८१.८१ टक्के इतका लागला असून जागृती गणेश चिकणे या विद्यार्थ्यीनीने ८१.२० % इतके गुण संपादित करून विद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा बहुमान पटकावला आहे.

सदरचे विद्यालय हे तालुक्यातील दुर्गम भागात वसले आहे.तरीही येथील विद्यालयाचा दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल विद्यालयाच्या स्थापनेपासून अतिशय चांगला लागत आहे.तर या वर्षीच्या निकालात प्रथम क्र.जागृती गणेश चिकणे ८०.२० टक्के ,द्वितीय क्र.तन्वी रामदास आमले ७९.२० टक्के, तृतीय क्र.शेखर दयाराम मांडवकर ७८.४० टक्के, चतुर्थ क्र.निलेश अनंता पवार ७७.४० टक्के,तर पंचम क्र.रुचिता रमेश माळी ७२.६० टक्के यांनी पटकावले आहे.विद्यार्थी वर्गाच्या या सुयशाबद्दल चेअरमन महेंद्र पोटफोडे उपाध्यक्ष राम कापसे सचिव धोंडू कचरे व सर्व संचालक मंडळ तसेच शाळा सामिती अध्यक्ष

रामचंद्र चितळकर,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष हरिश्चंद्र बाबू धामणसे, मुख्याध्यापिका अर्चना मरवडे व सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग तसेच विभागातील शिक्षणप्रेमी नागरिक यांनी अभिनंदन व्यक्त करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# जावळी इंग्लिश स्कुलचा दहावीचा निकाल १०० टक्के

**। माणगाव । वार्ताहर ।**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी शाळांत परीक्षेचा निकाल शुक्रवार दि. २७ मे रोजी ऑनलाईन जाहीर झाला. या परीक्षेत माणगाव तालुक्यातील श्री गोरक्षनाथ शिक्षण प्रसारक मंडळाच्या इंग्लिश स्कुल जावळी शाळेने आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या शाळेचा दहावी परीक्षेचा एकूण निकाल १०० टक्के लागला आहे.

या शाळेतून कु. साईराज मंगेश केकाणे या विद्यार्थ्याने ९१ टक्के इतके गुण संपादन करून शाळेमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे. कु. अनिष्का अनंत शिर्के या विद्यार्थिनीने ८२ टक्के गुण संपादन करून द्वितीय क्र. तर कु. आर्यन ज्ञानेश्वर लहाने या विद्यार्थ्याने ८०.६०% गुण संपादन करून तृतीय क्रमांक पटकावत शाळेच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला आहे. या शाळेचा दरवर्षी निकाल उंचावत असल्याने पालकवर्गांमधे तसेच विद्यार्थ्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण आहे.

यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे श्री गोरक्षनाथ शिक्षण प्रसारक मंडळ अध्यक्ष सुभाष केकाणे, सचिव, मार्गदर्शक भोरावकर गुरुजी, सर्व पदाधिकारी तसेच मुख्याध्यापक बरगे सर, शाळेचे को-ऑर्डिनेटर, सर्व शिक्षक वर्ग शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांनी विशेष अभिनंदन करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# माणगाव निकम इंग्लिश स्कुलचा दहावी परीक्षाचा निकाल १०० टक्के

## अनुष्का जैन ९८.२० टक्के गुण मिळवून शाळेमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण

**। माणगाव। वार्ताहर ।**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी शाळांत परीक्षेचा निकाल सोमवार दि. २७ मे २०२४ रोजी ऑनलाईन जाहीर झाला.या परीक्षेत माणगाव येथील एस.एस.निकम इंग्लिश स्कुलने आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या शाळेचा दहावी परीक्षेचा एकूण निकाल १०० टक्के इतका लागला असूनअनुष्का दिलीप जैन या विद्यार्थिनीने ९८.२० टक्के इतके गुण संपादन करून शाळेमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा



मान मिळविला आहे.

या शाळेमधून अनुष्का पांडुरंग उभारे या विद्यार्थिनीने ९७.२० टक्के गुण संपादन करून द्वितीय क्रमांक, कु. सनप्रीतसिंग वीरेंद्रसिंग बर्मन या विद्यार्थ्याने ९६.६० टक्के गुण संपादन करून तृतीय क्रमांक, श्रावणी प्रफुल्ल गवळी या विद्यार्थिनीने ९६.४० टक्के इतके गुण संपादन करून चतुर्थ क्रमांक तर कु. मंथन अरुण फराडे या विध्यार्थ्यांने ९६.२० टक्के इतके गुण संपादन करून पाचवा क्रमांक पटकावत शाळेच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला आहे.

या शाळेमधून यावर्षी दहावी परीक्षेसाठी एकूण ११९ विद्यार्थी बसले होते हे सर्व विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. त्यापैकी १०३ विध्यार्थ्यानी विशेष प्राविण्य संपादन करून १३ विध्यार्थी प्रथम श्रेणीत तर ३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

या शाळेचा दरवर्षी निकाल उंचावत असल्याने पालकवर्गांमधे तसेच विद्यार्थ्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण आहे.यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे माणगाव एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. मदन निकम, सर्व पदाधिकारी तसेच एस.एस. निकम इंग्लिश स्कुल माणगावच्या प्राचार्या,प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक, शाळेचे को-ऑर्डिनेटर, सर्व शिक्षक वर्ग शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांनी विशेष अभिनंदन करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# सृष्टी पाटील उरण तालुक्यात प्रथम

## सलग सहाव्या वर्षीही परंपरा कायम

**। उरण । वार्ताहर ।**

जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे पदाजी पांडुरंग मुंबईकर इंग्लिश मिडियम स्कूल,वेश्वी शाळेचा इयत्ता दहावीचा बोर्डाचा २०२३-२४ वर्षाचा एकूण निकाल सलग सहाव्या वर्षीही १०० टक्के एवढा लागला.

कुमारी सृष्टी किरण पाटीलने ९६.०० टक्के गुण मिळवून संपूर्ण उरण तालुक्यात प्रथम येण्याचा मान पटकावला, कुमार हर्ष केशव ठाकूर ८६.६० टक्के गुण मिळवून शाळेत द्वितीय तसेच कुमार विघ्नेश अजित ८६.०० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे.

शाळेच्या एकूण निकालामध्ये ६५ विद्यार्थ्यांपैकी १६ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य तर ४४ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळवून घवघवीत यश संपादन केले.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक जे.एम.म्हात्रे(भाऊ),संस्थेचे अध्यक्ष प्रितम जनार्दन म्हात्रे, संस्थेचे सचिव जे.के. मढवी सर, शाळा समितीचे चेअरमन चंद्रकांत मुंबईकर, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक प्रितम टकले व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका तृप्ती म्हात्रे यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# दहावीच्या परिक्षेत जागृती झोरे प्रथम

**। माथेरान । वार्ताहर ।**

प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिर, माथेरान शाळेची विद्यार्थिनी कु.जागृती सुरेश झोरे हिचा एसएससी परीक्षेत प्रथम क्रमांक ८३ टक्के गुण प्राप्त करून माथेरान मध्ये अव्वल ठरली आहे. यावर्षी विद्यार्थीनींनी बाजी मारली असून तर द्वितीय क्रमांक स्वराज सचिन काळे ८१.६० टक्के तृतीय क्रमांक बुशरा आयुब शेख हिला ८०.६० टक्के गुण मिळाले आहेत.

शाळेचा एकूण निकाल शंभर टक्के लागला असून उतीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थी तसेच त्यासाठी मेहनत घेणाऱ्या सर्व शिक्षकांचे धनगर समाजाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.जागृती झोरे हिच्या



घरी जाऊन धनगर समाजाचे माजी अध्यक्ष राकेश कोकळे, शैलेश ढेबे, करण जानकर तसेच अन्य बांधवांनी पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

# नांदगाव हायस्कूलचा निकाल ९३.१३ टक्के

## शामल पाटील ८५ टक्के गुण मिळवून प्रथम



**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

मुरूड तालुक्यातील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंत नगर नांदगाव येथील हायस्कूल चा निकाल ९३ .१३ टक्के एवढा लागला असून या विद्यालयातील शामल नथुराम पाटील या विद्यार्थिनीने ८५ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे.तर द्वितीय क्रमांक राज तुळसकर याला ७९ .६० टक्के येवढे गुण मिळवले आहेत. तृतीय क्रमांक आयुष पाटील याला ७७.८० टक्के येवढे गुण मिळाले. चतुर्थ क्रमांक शर्वरी नाक्ती हिला ७७ .६० टक्के गुण मिळाले. सृष्टी पाटील हिला ७७ .४० टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक मिळवला आहे.

नांदगाव हायस्कूल मधील इयत्ता दहावी साठी १०२ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ९५ मुले पास झाले आहेत. सात विद्यार्थी डिस्टिंक्शन मध्ये तर ३० विद्यार्थ्यांना फर्स्ट क्लास गुण मिळवले आहेत.या हायस्कूलचा सेमी इंग्रजीचा निकाल शंभर टक्के एवढा लागला आहे. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे शाळेचे चेअरमन फैरोज घलटे, मुख्याध्यापक श्रीधर ओव्हाळ, पर्यवेक्षिका अर्चना खोत,सर्व संचालक सदस्य यांनी अभिनंदन केले आहे.

# कुरुळ माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल ८६.३६ टक्के

**। रायगड । प्रतिनिधी ।**

सु ए सो माध्यमिक विद्यालय, कुरुळ माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल ८६.३६ टक्के लागला आहे.

कुमारी शबा रिजवाना रजिउल्ला सिद्दीकी हिने ८४.८० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. कुमारी अपूर्वा धनश्री माधव गोसावी हिला ७८.४० टक्के गुण मिळून द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. तर प्रणय भारवी भरत कांबळे याने ७८.२० टक्के मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

स्थानिक शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ॲड. प्रसाद पाटील , शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता पाटील यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

ज्यांना यश मिळाले नाही त्या विद्यार्थ्यांनी निराश न होता पुन्हा प्रयत्न करावा असे आवाहन केले आहे. सर्व पालक, ग्रामस्थ , शाळेचे हितचिंतक यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

# राऊत विद्यालयाचा निकाल ९८.६३टक्के

**श्रीवर्धन** : मार्च २०२४ मध्ये झालेल्या एस.एस.सी. परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला.त्यामध्ये श्रीवर्धनच्या रविंद्र ना.राऊत माध्यमिक विद्यालयाचा निकाल ९८.६३ टक्के लागला आहे. सदर परीक्षेला १४८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १४५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सर्व उत्तीर्ण विद्यार्थी-विद्यार्थिनींचे संस्थेचे पदाधिकारी, शाळा समिती, मुख्याध्यापक जी.के.पाटील यांनी अभिनंदन केले आहे. श्री.घनःश्याम तळवटकर एज्युकेशन सोसायटी संचलित डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, दिघी, ता.श्रीवर्धन या शाळेने आपली शंभर टक्के निकालाची परंपरा यंदा कायम ठेवली असून पुढील तीन विद्यार्थी गुणानुक्रमे यशाचे मानकरी ठरले आहेत. रोहित सचिन मापुस्कर ७८.६० टक्के, इलहम इरशादहसवारे ७४.६० टक्के तर रोहन किशोर पाटील ७३ टक्के संस्थेच्या रंजना तळवटकर व सर्व पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आहे.

# माणगाव अशोकदादा साबळे विद्यालयाचा दहावी परीक्षा निकाल ९५.४२ टक्के

## मृणाल सवासे ९६.८० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण

**। माणगाव । वार्ताहर ।**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी शाळांत परीक्षेचा निकाल दि. २७मे रोजी ऑनलाईन जाहीर झाला. या परीक्षेत माणगाव तालुक्यातील माणगांव शिक्षण प्रसारक मंडळाच्या अशोकदादा साबळे विद्यालयाने आपल्या नेत्रदीपक यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या शाळेचा दहावी परीक्षेचा एकूण निकाल ९५.४२ टक्के इतका लागला असून कु. मृणाल राहुल सवासे या विद्यार्थ्याने ९६.८० टक्के इतके गुण संपादन करून शाळेमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे.

या शाळेमधून कु. सई विठोबा शिंदे या विद्यार्थिनीने ९४.८०% गुण संपादन करून द्वितीय क्रमांक, कु. शरयू संदिप कुलकर्णी या विद्यार्थ्याने ९४.६०% गुण संपादन करून तृतीय क्रमांक पटकावत शाळेच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला आहे. या शाळेमधून यावर्षी दहावी परीक्षेसाठी एकूण १७५ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १६७ विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. त्यापैकी ६६ विद्यार्थी विशेष प्राविण्य श्रेणीत तर प्रथम श्रेणीत ५८ विद्यार्थी तर द्वितीय श्रेणीत ३७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या शाळेचा दरवर्षी निकाल उंचावत असल्याने पालकवर्गांमधे तसेच विद्यार्थ्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण आहे. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे माणगांव शिक्षण प्रसारक मंडळ अध्यक्ष ॲड.. राजीव साबळे, सेक्रेटरी कृष्णा गांधी, स्कुल कमिटी चेअरमन नरेंद्र गायकवाड ,शाळेच्या शिक्षिका तथा माणगाव नगरपंचायतीच्या स्वच्छता व आरोग्य समिती सभापती शर्मिला सुर्वे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, सदस्य, स्कुल कमिटी चेअरमन नरेंद्र गायकवाड तसेच मुख्याध्यापक डी.एम.जाधव उपमुख्यध्यापक दिलीप उभारे, उपप्राचार्य एम.एस. जमधाडे, शाळेचे को-ऑर्डिनेटर, शिपूरकर व गणेश वाघरे, इंग्लिश स्कुल कमिटी चेअरमन अरुण पवार, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

# चिंतामणराव केळकर विद्यालयाचा सलग १२ व्या वर्षी शंभर टक्के निकाल

**। अलिबाग । प्रतिनिधी।**

अलिबाग येथील चिंतामणराव केळकर विद्यालयाने दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के निकाल लावण्याची आपली परंपरा कायम राखली आहे. दहावीच्या परीक्षेत सलग १२ व्या वर्षीही चिंतामणराव केळकर विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला आहे. स्वरा अविनाश पाटील हिने ९७.६० गुण मिळवून शाळेत प्रथम येण्याचा मान मिळवला.

मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत चिंतामणराव केळकर विद्यालयाचे मराठी माध्यमाचे २० विद्यार्थी, सेमी इंग्रजी माध्यमाचे ४८ विद्यार्थी तर इंग्रजी माध्यमाचे ५३ विद्यार्थी असे एकूण १२१ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाले होते. हे सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यापैकी ८ विद्यार्थी ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झाले. ४४ विद्यार्थीना ८० टक्के पेक्षा जास्त गुण मिळाले. ३४ विद्यार्थी ७० टक्के पेक्षा जास्त तर.२७ विद्यार्थी ६० गुण मिळवून उत्तीर्ण झाले.८ विद्यार्थी ५० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झाले.

मराठी माध्यमात आर्या संदेश आठवले हेने ८५ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम येण्याचा मान मिळवला. सेमी इंग्रजी माध्यमामध्ये मयुरेश शैलेश पाटील शाळेत पहिला आला. त्याने ९३ टक्के गुण मिळवले. इंग्रजी माध्यमध्ये स्वरा अविनाश पाटील हिने ९७.६० गुण मिळवून शाळेत प्रथम येण्याचा मान मिळवला.

**निवडक**

### ट्रकची डिव्हायडरला धडक

**खोपाली :** जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर खोपोली एक्झिट येथील पुलाखाली ट्रक चालककाने अतिवेगाने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून धोकादायक रित्या ट्रक चालवुन रोडच्या डाव्या बाजुला असलेल्या सिमेंटच्या डिव्हायडरला धडक दिली. या धडकेत ट्रक पलटी होऊन चालक दुखापतग्रस्त झाला. याबाबत खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पालीस हवालदार अमोल धायगुडे हे करीत आहेत.

### मोटरसायकलची धडक

**पाली :** पाली विळे रस्त्यावर अडुळसे बस स्टॉप जवळ एक इसम किर्तनासाठी सिध्देश्वर येथील २१ गणपती मंदीर येथे पायी चालत जात असताना मोटारसायकल (एमएच-०६-सीजी-४८३३) चालकाने रोडच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगाने चालवुन रोडच्या राँग साईडला येऊन समोरून धडक दिली. यात या इसमाच्या उजव्या पायाला व डोक्याला गंभीर दुखापत झाली. याबाबत पाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार घासे, हे करीत आहेत.

### अल्पवयीन मुलगी बेपत्ता

**पाली:** सुधागड येथील राबगाव आदिवासीवाडी येथील अल्पवयीन मुलगी हि राहते घरातुन आईला पाली येथे जाते असे सांगुन घरातुन निघुन गेली. ती अद्यापपर्यंत घरी परत आलेली नाही. कोणीतरी अज्ञात ईसमान मुलीचा अज्ञानाचा व अल्पवयीन असल्याचा फायदा घेऊन फुस लावुन पळवुन नेले असल्याची तक्रार पाली पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला असून अधिक तपास सफौ. एस.एन. गायकवाड हे करीत आहेत.

### टँकर जाळण्याचा प्रयत्न

**महाड :** संगमनगर इसाने कांबळे (खर्डी) या व्यक्तीन पाण्याच्या टँकरच्या जुन्या वादाच्या रागातुन महाड येथील व्यक्तीच्या मालकीचे पार्किंगमध्ये उभे असलेले टाटा कंपनीचे (एमएच-०६-जी-८८२९ व एमएच-०४-सीजी-१६८८) हे दोन टँकरवर पहाटे तीन वाजताच्या सुमारास रॉकेल टाकुन जाळण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान टँकर मालक जागे झाले असता कांबळे हे मोटारसायकलीने पळुन गेले. याबाबत महाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### गोरेगावमध्ये अपघात

**गोरेगांव :** मुंबई-गोवा महामार्गावर लोणेरे फाटा येथील सर्व्हीस रोडवर स्कॉरपीओ (एमएच-१२-क्युवाय-५१३३) चालकाने लाखपाले गावाकडे जाण्यासाठी रस्ता क्रॉस करीत असणाऱ्या इसमाला पाठीमागुन येत धडक दिली. या धडकेत रस्ता क्रॉस करत असलेल्या व्यक्तीच्या उजव्या पायाला गंभीर दुखापत केली. धडक होताच स्कॉरपीओ चालक अपघाताची खबर न देताच पळुन गेला. याबाबत गोरेगांव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अलिबागच्या आंब्याला ठाणे, मुंबईत मागणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील अलिबागमधील हापूस आंब्याला मुंबई, ठाणे, पुणे जिल्ह्यात प्रचंड मागणी वाढली आहे. महिन्याभरात सहा लाख रुपये किंमतीचा आंबा विक्री झाल्याची माहिती आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी दिली आहे. आंब्याला दर चांगले मिळाल्याने आंबा उत्पादक शेतकऱ्यांना या कालावधीत सुगीचे दिवस आले असल्याचे बोलले जात आहे.



रायगड जिल्ह्यात १४ हजार हेक्टर आंब्याचे क्षेत्र असून वीस हजाराहून अधिक आंबा उत्पादक शेतकरी आहेत. जिल्ह्यात भात शेतीबरोबरच आंबा लागवडीवर गेल्या दहा वर्षांपासून भर दिला जात आहे. भातशेतीला पुरक व्यवसाय म्हणून आंबा लागवडीकडे पाहिले जात आहे. त्यामुळे आंब्याची लागवडदेखील करण्याकडे शेतकरी अधिक वळू लागला आहे. यंदा अवकाळी पावसाबरोबरच किडरोगामुळे आंब्याच्या उत्पादनात ५० टक्केहून अधिक घट झाली. त्यामुळे शेतकरी चिंतेत होते. उत्पादनात घट झाली असली, तरीदेखील आंब्याला यंदा मागणी वाढली आहे. त्यात अलिबागच्या आंब्याला प्रचंड मागणी असल्याचे दिसून आले आहे.

> **आंबा उत्पादनात यंदा घट आहे. मागणी अधिक पुरवठा कमी अशी परिस्थिती आहे. त्यामुळे आंब्याचे दर वाढले आहेत. एक डझन आंब्यासाठी ग्राहकांना अडीचशे ते तीनशे रुपये मोजावे लागत आहेत. पाऊस पडला नाही तर जूनच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत अलिबागच्या आंब्याला मागणी राहणार आहे.**
>
> **-प्रदिप बैनाडे,**
> **तालुका कृषी अधिकारी**

तालुक्यात आंब्याचे क्षेत्र १ हजार ५५० हेक्टर असून सात हजारहून अधिक शेतकरी आंबा उत्पादक आहेत. मुंबई, ठाणे, पुणे येथील ग्राहकांनी या वर्षी अलिबागच्या आंब्याला अधिक पसंती दर्शविली. यावर्षी आंब्याला भाव चांगला मिळाला आहे. एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यापासून आंब्याच्या मागणीला सुरुवात झाली. महिनाभरात सुमारे ७००हून अधिक आंब्याच्या दोन डझनच्या पेट्या विकल्या असल्याची माहिती आंबा उत्पादक शेतकरी मनोज पाटील यांनी दिली. यंदा वेगवेगळ्या आकाराच्या आंब्याला सहाशे रुपयांपासून १ हजार ४०० रुपयांचा भाव मिळाला आहे. आंब्याची मागणी जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# शहाबाजमध्ये बस थांबा फलकाचे अनावरण

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग-पेण मार्गावरील शहाबाज येथील स्थानकाजवळ बस विनंती थांबा फलकाचे अनावरण नुकतेच करण्यात आले. शहाबाजमधील ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष मोहन पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून या फलकाचे अनावरण करण्यात आले आहे.

अलिबाग-पेण मार्गावरून येणाऱ्या जाणाऱ्या साधी, जलद, निमआराम अशा सर्व प्रकारच्या गाड्या शहाबाज येथे थांबविण्यासाठी आदेश देण्यात आले होते. मधल्या काळात रिकामी गाडी सुद्धा थांबविण्यात येत नव्हती. त्यामुळे प्रवाशांची प्रचंड गैरसोय झाली होती. ज्येष्ठ नागरिक संघटना शहाबाज आणि पायरी गृप यांच्या अथक प्रयत्नानंतर बस थांबा फलकाचे अनावरण करण्यात आले. शहाबाज ग्रामस्थांनी सुद्धा फलक उभारण्यासाठी मोलाची मदत केली. एसटी महामंडळ रायगड विभागाचे विभाग नियंत्रक दिपक घोडे, स्नेहल सरडे, आगार व्यवस्थापक अर्पणा वर्तक, अशिष पाटील यांचे ज्येष्ठ नागरिक संघटना व पायरी गृपच्यावतीने आभार व्यक्त करण्यात आले.



यावेळी गावांतील ग्रामस्थ, महिला, ज्येष्ठ नागरिक संघटनेचे पदाधिकारी, वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळी, मान्यवर उपस्थित होते.

# मुरूड आगार बंद आंदोलनाला स्थगिती



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड आगारातील अवस्था एवढी भयानक असुन जुन्या भंगार अवस्थेत असलेल्या एसटीवर आपले आगार चालत असल्याने प्रवाशांना प्रवास करताना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यासाठी पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी आपल्या पदाधिकाऱ्यांसह मुरूड आगारात जावून समस्यांबाबत चर्चा करण्यात आली. जर सुधारणा होत नसेल तर २ जुनपासुन आगार बंद आंदोलन करु, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला होता. याची दखल घेत पेणचे उपविभागीय अधिकारी मनिषा पाटील व उपविभागीय कार्यशाळा अधिकारी चेतन देवधर यांनी मुरुड डेपोत येऊन निवेदन देणारे अरविंद गायकर व पदाधिकाऱ्यांसोबत समस्यांबाबत चर्चा करण्यात आली.

यावेळी मनिषा पाटील यांनी सांगितले की, तुमच्या मागण्या बहुतेक मान्य केल्या आहेत. अलिबागवरुन सकाळी सव्वासात वाजता मुरुड-अलिबाग सुरू केली आहे. जर कुठल्या गाड्या सुटत नसतील तर त्याची माहिती द्यावी. अंतर्गत रस्ता ही सुरू केला आहे. राहिला नविन गाड्यांचा प्रश्न. तो ही लवकरात लवकर सोडवु. तरी २ जुनला होणारा आगार बंद आंदोलन स्थगित करावे. अशी विनंती यावेळी करण्यात आली.

तसेच, चेतन देवधर यांनी सांगितले की, रेवदंडा पुलावरून १४ टनच्या गाड्यांना परवानगी नसल्यामुळे आपल्याकडे नविन गाड्या येऊ शकल्या नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन पत्र मिळाले तर नविन गाड्या मिळु शकतात. अशी प्रतिक्रिया यावेळी चेतन देवधर यांनी दिली.

# वरवठणे कोंड स्वप्नातील गाव म्हणून घोषित

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

स्वदेस फाउंडेशनचे संस्थापक रॉनी स्क्रूवाला आणि झरीना स्क्रूवाला तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यातील सात तालुक्यांमध्ये अनेक विकासाची वेगवेगळी कामे होत आहेत. दोन वर्ष आधी स्वदेस फाउंडेशनने गावांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी लोकांचा सहभाग वाढवण्यासाठी स्वप्नातील गाव या स्पर्धेचे आयोजन केलेले होते. या स्पर्धेमध्ये अनेक गावांनी हिरारीने भाग घेतला होता. यामध्ये म्हसळा तालुक्यातील वरवठणे कोंड गावानेही भाग घेतला होता. वरवठणे कोंड गावाने नुकताच मोठ्या उत्साहात खालू बाजा,



लेझीम नृत्य, सांस्कृतिक कार्यक्रम करून आपलं गाव स्वदेस फाऊंडेशन तर्फे स्वप्नातील गाव म्हणून जाहीर केले.

गाव विकास समितीने उपस्थित असलेल्या मान्यवरांचे यथोचित सन्मान करून आपल्या गावाची झालेली प्रगती व त्या साठी लाभलेले स्वदेस, शासन आणि ग्रामस्थांच्या सहकार्याचा प्रवास सांगितला. आपल्या आराखड्यातील ८०% कामे पूर्ण केलेली असून पुढील प्रगती अशीच सुरू ठेवणार असे सांगितले. या सगळ्या कार्यात महिलांचे योगदान मोठे असल्याचे दिसून आले. आपल्या पाण्याची भविष्यातील चिंता दूर व्हावी यासाठी गावाने स्वदेसने मार्गदर्शन केल्याप्रमाणे स्वजल स्पर्धे अंतर्गत असलेली ७८% कामे पूर्ण केली आहेत. यामध्ये बंधारा, समतल चर, स्रोत स्वछता, रंगरंगोटी, पाणी तपासणी, परसबाग लागवड इत्यादी कामे झाली आहेत.

या कार्यक्रमासाठी स्वदेस फाऊंडेशनचे उपसंचालक प्रसाद पाटील, वरिष्ठ व्यवस्थापक शिवतेज ढऊळ, प्रशांती मि कायला, रोहिणी जोशी, कौस्तुभ कांबळे, चेतन सवादकर, विवेक गंधाले, गाव विकास समितीचे सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.



# स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती साजरी

**। म्हसळा । वार्ताहर ।**

स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा जन्म २८ मे १८८३ रोजी महाराष्ट्रातील नाशिकजवळील भगूर या गावी एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांच्या जयंतीनिमित्त केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयांत त्यांच्या प्रतिमेचे पूजन आणि अभिवादन करण्यात आले.

यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे, सुनील उमरोटकर, पांडुरग पाटील, कमलाकर कुरकुरे, सुजय कुसळकर, अरविंद बैनवाड, परशुराम नक्ती, उदय करडे, सायली चोगले, प्राची मेंदडकर, धनंजय सरनाईक, अशोक सानप, परशुराम नाक्ती, सुशिलकुमार गाडगे, के.पी शिंदे उपस्थित होते.

### तळोजा परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** तळोजा फेज परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध तळोजा पोलीस करीत आहेत. सदर इसमाचे अंदाजे वय ३८ वर्षे, उंची अंदाजे ५ फुट २ इंच, रंग गहुवर्णीय, अंगाने मध्यम, डोक्याचे केस काळे पांढरे, चेहरा गोल आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास तळोजा पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक प्रतापसिंह चौहान यांच्याशी संपर्क साधावा.



● मुरुडचा जंजिरा किल्ला पर्यटकांसाठी बंद झाला आहे. रोज हजारो पर्यटकांची वाहने व रांगा लागत होत्या ती जेट्टी आता शांत झाल्याचे चित्र आहे. (छाया- सुधीर नाझरे)

# वर्षभरात नवीन विहिर खोदण्याची वेळ

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील खांडस ग्रापंपंचायतीमधील चाफेवाडी येथील नळपाणी योजना जुलै २०२३ मध्ये कार्यान्वित झाली असून उद्धव विहिरीमध्ये पाणी नसल्याने नळपाणी योजना बंद आहे. त्यामुळे तीन आदिवासी वाड्यांसाठी आता नवीन विहीर खोदल्या जात आहेत. जलजीवन मिशनच्या या अनागोंदी कारभाराबद्दल स्थानिक आदिवासी ग्रामस्थांनी संतप्त भावना व्यक्त केल्या आहेत. दरम्यान, सहा महिन्यात नळपाणी योजना पाच वाड्यांना पिण्याचे पाणी पुरवण्यास निष्फळ ठरत असल्याने जलजीवन मिशनच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

खांडस ग्रामपंचायतमधील चाफेवाडी आणि पाच वाड्यांसाठी जलजीवन मिशन मधून नळपाणी योजना राबविण्यात आली. त्यावेळी जुलै महिन्यात या नळपाणी योजनेचे उद्घाटन झाले आणि पाणी योजनेचे पाणी पाच आदिवासी वाड्यांमधील लोकांना मिळू लागले. मात्र, मार्च अखेरपासून या नळपाणी योजनेचे पाणी स्थानिक ग्रामस्थांना मिळाले नाही. त्यामुळे पादीर वाडी, वडाची वाडी आणि टेपाची वाडीमधील आदिवासी लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी उन्हाळ्यात कोरड्या असलेल्या चिल्लार नदीमध्ये डवरे खोदून पाणी भरून आपल्या घरी न्यावे लागत आहे. त्यामुळे शासनाकडून या तीन आदिवासी वाडीमध्ये राहणाऱ्या ग्रामस्थांची गैरसोय लक्षात घेऊन शासनाने या तीन वाड्यांसाठी नवीन विहीर मंजूर केल्या आहेत.



# कोप्रोली नाक्यावर गॅस सिलिंडरचा स्फोट

**। उरण । वार्ताहर ।**

कोप्रोली नाक्यावर गुप्ता सँडविच आणि ज्युस सेंटरच्या दुकानात गॅस सिलिंडरचा स्फोट झाल्याची घटना मंगळवारी (दि.२८) दुपारी चार वाजताच्या सुमारास घडली. या स्फोटाची तीव्रता एवढी होती की दुकानांचे छप्पर हवेत उडाले. मात्र, दुकानदार थोडक्यात बचावला आहे. या



घटनेची माहिती रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य महेंद्र ठाकूर यांनी अग्निशमन दलाच्या जवानांना दिली. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आगीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. यामुळे मोठा अनर्थ टळला आहे. मात्र, या स्फोटात नागरी वस्तीतील रहिवाशांच्या कानपिचक्या बसल्या असून बाजूच्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे नुकसान झाले आहे.

# उड्डाणपुलाखाली अनधिकृत बस अड्डा

**। पनवेल ग्रामीण । वार्ताहर ।**

मुंब्रा-पनवेल महामार्गावर कळंबोली येथील उड्डाणपुला खाली सध्या मोठ्या प्रमाणात प्रवासी बस उभ्या केल्या जात आहेत. या बसमुळे वाहतूकीला अडथळा होत असतानादेखील कळंबोली वाहतूक विभागाकडून याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे.



मुंब्रा-पनवेल महामार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. दररोज होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी कळंबोली येथे उड्डाणपुल बांधण्यात आले आहेत. मात्र, त्या नंतर देखील कळंबोली सर्कल ते कळंबोली येथे बांधण्यात आलेल्या उड्डाण पुलावरदेखील वाहतूक कोंडी होत असते. पुलावर होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी अनेक वाहन चालक पुलावरून जाण्याऐवजी पुलाखालून असलेल्या सर्व्हिस रोडचा वापर करणे पसंत करतात. मात्र, या ठिकाणी पुलाखाली तसेच सर्व्हिस रोडवर अनधिकृतपणे उभ्या करण्यात येणारे अवजड वाहन आणि बसमुळे सर्व्हिस रोडवर देखील वाहतूक कोंडी होत आहे. यासाठी पुलाखाली उभ्या करण्यात येणाऱ्या बसवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी स्थानिकानकांडून करण्यात येत आहे. याबाबत कळंबोली वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिभाऊ बाणकर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

# स्थानिक कलाकारांना, सूत्रसंचालकांना सुगीचे दिवस

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

साखरपुडा, हळद, लग्न, जन्मदिवस, लग्नाचा वाढदिवस, सेवानिवृत्ती किंवा गेट टुगेदर कार्यक्रम हे सर्व प्रतिष्ठेचे मानले जात आहेत. आणि या कार्यक्रमांमध्ये नवचैतन्य आणण्यासाठी व मनोरंजन करण्यासाठी सध्या निवेदक, सूत्रसंचालक, गायक व म्युझिक गृप आदींना मागणी वाढताना दिसत आहे. हा नवीन ट्रेंड सध्या सर्वत्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे स्थानिक व होतकरू कलाकारांना प्रचंड मागणी वाढत आहे. या कलाकारांना देखील आपली कला जोपासण्याची व त्यातून अर्थार्जन करण्याची नामी संधी मिळत आहे.



### अर्थार्जनाबरोबर कलेला वाव

रायगड जिल्ह्यात हौशी व प्रतिष्ठा जपणाऱ्या लोकांची संख्या अधिक आहे. लग्न समारंभ असो की सेवानिवृत्ती कार्यक्रम किंवा बारसे व वाढदिवस अशा कार्यक्रमांमध्ये आता फक्त विद्युत रोषणाई, डेकोरेशन, जेवणावळ्या एवढेच राहिलेले दिसत नाही. तर, आलेल्या पाहुण्यांचे चांगले मनोरंजन व्हावे. त्याचबरोबर या कार्यक्रमाला हजेरी लावलेल्या प्रतिष्ठित लोकांचा व पाहुण्यांचा उल्लेख व्हावा. शिवाय यांच्या कामाची माहिती मिळावी. कार्यक्रमांमध्ये जिवंतपणा यावा यासाठी निवेदक, सुत्रंचालक आणि गायक म्युझिकल ग्रुप हवाच. त्याशिवाय कार्यक्रमांना रंगत येत नाही.

### शोभा व प्रतिष्ठा वाढते

**अगदी छोट्या-मोठ्या कार्यक्रमात हमखास स्थानिक निवेदक व सूत्रसंचालक बोलावले जातात. हे सूत्रसंचालक आलेल्या पाहुण्यांची नावे घेतात, त्यांचा परिचय देतात. परिणामी आलेल्या पाहुण्यांना समाधान मिळते त्यांचा मानमर्तब वाढतो. गायक म्युझिकल गृप कार्यक्रमात असल्यामुळे कार्यक्रमाची शोभा वाढते, आयोजकांना प्रतिष्ठा मिळते.**

> **अगदी छोट्या-मोठ्या कार्यक्रमांना देखील सूत्रसंचालक व निवेदक लागू लागले आहेत. त्यामुळे मागणी वाढली आहे. सूत्रसंचालक व निवेदकांना चांगले दिवस आले आहेत. जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये कार्यक्रमासाठी जातो. आयोजकांनी दिलेले मानधन आनंदाने स्वीकारतो. याबरोबरच कार्यक्रमानुसार स्वतःला अद्ययावत ठेवले आहे. आयोजकांना समाधान व आनंद मिळतो. अनेक जण आगाऊ बुकिंग देखील करून ठेवत आहेत.**
>
> **- संदीप काटकर,**
> **सूत्रसंचालक व निवेदक, पाली**

# महायुतीतील धुसफूस

महाराष्ट्रातील निवडणुका संपल्यानंतर महायुतीमधील धुसफूस बाहेर येऊ लागली आहे. पुण्याचे मतदान तेरा मे रोजी झाले. त्यानंतर अजित पवार प्रचारातून हळूहळू दिसेनासे झाले. मुंबई-ठाण्यातील मतदान वीस मे रोजी होते. त्याच्या प्रचारात दादांनी रस घेतला नाही. नरेंद्र मोदींच्या चेंबूरमधील रोडशोला ते हजर नव्हते. कहर म्हणजे दादा आजारी आहेत असे मिडियाला कळले ते शरद पवार यांच्याकडून. मुंबईतील शिवाजी पार्कच्या सभेमध्ये अजितदादा व्यासपीठावर होते. पण एकूण भाजपपासून त्यांनी राखलेले अंतर हे सहज जाणवण्यासारखे होते. त्यापूर्वी पुण्याच्या सभेत मोदी पवार यांना भटकता आत्मा म्हणाले. त्याची वाईट प्रतिक्रिया बारामतीमध्ये आली. त्यामुळे मोदी ते कोणाविषयी बोलले हे त्यांनाच विचारून पुढच्या वेळी मी तुम्हाला सांगतो असे दादा मिडियाला म्हणाले. आजकाल प्रचाराला कोणाला बोलावायची सोय राहिलेली नाही असा शेरा त्यांनी त्यावेळी मारला. त्याच वेळी, आम्हाला बारामतीतून शरद पवार यांचे राजकारण संपवायचे आहे असे भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील म्हणाले. पाटील यांचे हे विधान दादांच्या पत्नी सुनेत्रा यांना अडचणीत आणणार असे म्हटले गेले. त्यामुळे दादा त्यांच्यावर भडकले. नंतर यावर बरीच सारवासारव केली गेली. पण दादा भाजपवर नाराज आहेत हे लपूनराहिले नाही. तिकडे नाशिकमध्येदिंडोरीत दादांचे आमदार शरद पवार यांच्या उमेदवाराचे काम करीत होते. याखेरीज छगन भुजबळ वृत्तवाहिन्यांना मुलाखती देऊन शालजोडीतले शेरे हाणत होते. उद्धव ठाकरे व शरद पवार यांना लोकांमध्ये सहानुभूती आहे, पण ती मतांमध्ये किती परावर्तीत होते हे पाहावे लागेल असे ते सांगत होते. नाशिकच्या जागेवर उमेदवारीचा जो घोळ घालण्यात आला त्याबद्दलही त्यांनी अनेकदा टीका केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे महायुतीमध्येफारसे जमत नसावे असेच दाखवणारे हे प्रसंग होते.

आता पुन्हा ही धुसफूस बाहेर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सोमवारी मुंबईत झालेल्या बैठकीत पुन्हा एकवार भुजबळांनी भाजपवर तोफ डागली. भाजपच्या चारशे पार जागा जिंकण्याच्या घोषणेमुळे दलितांमध्ये चुकीचा संदेश गेला असे ते म्हणाले. पुन्हा सत्तेत आल्यास मोदींचा भाजप राज्यघटना बदलून टाकेल व आरक्षण काढून घेईल अशी भीती दलितांमध्ये निर्माण झाली. त्याचा फटका मतदानातून सर्वांनाच बसणार आहे असे भुजबळ म्हणाले. दुसरे म्हणजे लोकसभेच्या जागावाटपातराष्ट्रवादीवर अन्याय झाला अशी अप्रत्यक्ष तक्रार त्यांनी केली. विधानसभेच्या जागावाटपाच्या वेळी भाजपला गोंधळ घालू देता कामा नये असा इशारा त्यांनी दिला. लोकसभा निवडणुकीतअजितदादा गटाला एकही जागा मिळणार नाही असे अंदाज बऱ्याच जणांनी व्यक्त केले आहेत. तसे झाले तर दादांच्या गटाची पुरती बेअब्रू होईल. बारामतीची जागा समजा त्यांनी जिंकलीच तरच त्यांचा थोडा सन्मान टिकून राहील. कारण, बारामतीत शरद पवारांना हादरा देणे हेच भाजपचे मुख्य कारस्थान होते व ते यशस्वी झालेले दिसेल. निकाल काहीही लागले तरी विधानसभेच्या जागावाटपात दादांची बाजू बरीच पडती राहील हे स्पष्ट दिसते आहे. ते रोखण्यासाठीच दादा गटाने आधीपासून आरडाओरड सुरू केलेली दिसते.महायुतीत सामील होताना विधानसभेच्या ८० ते ९० जागांची उमेदवारी देऊ असे आश्वासन भाजपने दिले होते. त्याची अंमलबजावणी व्हायलाच हवी अशी मागणी भुजबळांनी केली. २०१९ मध्ये दोन्ही काँग्रेस विरुध्द सेना-भाजप अशी लढाई झाली होती. त्यामुळे सेनेने लढवलेल्या जागा आपोआप एकनाथ शिंदे यांच्याकडे जाणार आहेत. मात्र जिथे राष्ट्रवादी विरुध्द भाजप आणि राष्ट्रवादी विरुध्द शिवसेना अशी लढाई झाली असेल तिथे खरा प्रश्न येणार आहे. त्यावर शिंदे व दादा हे दोघेही दावा सांगणार आहेत. शिवाय, लोकसभेतल्या प्रमाणे भाजपवाले सर्वेक्षणांचा दाखला देऊन जागा किंवा उमेदवार बदलायला सांगू लागले तर ते शिंदे व दादा या दोहोंनाही भारी पडणार आहे.

अर्थातच, दादा गटाची सर्व बाजूंनी पंचाईत होणार आहे. लोकसभेला एकनाथ शिंदे यांनी भाजपकडून त्यांना हव्या त्या व हव्या तेवढ्या जागा पदरात पाडून घेतल्या. त्या मानाने दादा गटाला भाजपनेकिरकोळीत काढले असेच दिसले. हेच दृश्य विधानसभेला कायम राहिले तर राष्ट्रवादीचे कार्यकर्ते व मतदार नाराज होणार आहेत. त्यासाठी त्यांनी आतापासूनच हाकारे घालायला सुरुवात केली आहे खरी. पण लोकसभेला दादा गटाला किती यश मिळते यावर बरेच काही अवलंबून आहे. महायुतीमध्ये भाजप हाच मोठा भाऊ असून आम्हीच सर्वाधिक जागा लढवणार असे प्रत्युत्तर देवेंद्रफडणवीस यांनी दिले आहे. त्यांना आपले कार्यकर्ते सांभाळावे लागणार आहेत. आधीच दादांना सोबत घेतल्यामुळे भाजपचा कट्टर मतदार नाराज आहे. खुद्द देवेंद्रांनीटाईम्सला दिलेल्या मुलाखतीत याची कबुली दिली होती. लोकसभेला मोदींचे नाव सांगून या मतदाराची समजूत काढता आली. विधानसभेला परत तसेच करणे शक्य होणार नाही. त्यामुळे भाजपनेही सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतलेला दिसतो. दरम्यान, कालच्या बैठकीत अजितदादा यांनी शाहू-फुले-आंबेडकरांच्या तत्वांपासून आपला पक्ष ढळणार नाही याचा पुनरुच्चार केला. हा सरळच भाजपला इशारा होता. दिल्लीमध्ये मोदी, शाह व नड्डा यांच्याशी युतीत येण्याबाबत जी प्राथमिक चर्चा झाली होती त्यावेळीही आपल्या पक्षाने भाजपला हे स्पष्ट बजावले होते असे अजितदादा म्हणाले. वास्तविक कागदोपत्री पाहायला गेल्यास भाजपवालेही फुले-शाहू-आंबेडकरांचे नाव घेतात. तरीही दादांना हे नव्याने सांगावे लागावे याचाच अर्थ दादा भाजपसोबत गेल्यामुळे राष्ट्रवादीचा बराच मतदारही नाराज आहे. त्याला चुचकारण्याची दादांना गरज वाटते. दुसरे म्हणजे भविष्यात महायुतीशी न जमल्यास किंवा जागावाटपावरून चर्चा फिसकटल्यास स्वतःची वेगळी वाट चालण्याची तयारी दादा गटाने सुरू केली आहे असाही याचा अर्थ निघतो.कालपर्यंत विकास, मोदींची लाट यावर बोलणारे दादा गटवाले आता भाजपच्या धोतरालाच हात घालू पाहात आहेत हे मनोरंजक आहे. आगामी चार महिन्यात या नाटकात आणखी अनेक प्रवेश आणि प्रसंग जोडले जाणार आहेत.

विचार

# चर्चेत मालीवाल, 'आप'चे मात्र हाल!

***खासदार स्वाती मालीवाल यांना झालेल्या घृणास्पद मारहाणीमुळे 'आप'मध्ये नवे द्वंद्व सुरु झाले. केजरीवाल यांना अटक झाल्यानंतर मालीवाल परदेशी गेल्या. त्या वेळच्या संघर्षात त्या कोठेही नव्हत्या. या प्रकरणी होणारे दावे-प्रतिदावे, वेगवेगळे व्हिडीओ आणि परस्परांविरोधातील तक्रारी संभ्रम वाढवणारे आहे. मारहाण करणारा स्वीय सहायक केजरीवाल यांच्यासोबत दिसल्याने मालीवाल यांचे पित्त खवळले आणि 'आप'मध्ये नवेच रण पेटले.***

दिल्लीत भारतीय जनता पक्षाला आव्हान द्यायला निघालेल्या 'आप'मध्ये सुरु झालेल्या संघर्षामुळे भारतीय जनता पक्षाला आयते कोलित मिळाले. गेल्या वीस वर्षांपासून दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यासोबत काम करणाऱ्या खासदार स्वाती मालीवाल आणि पक्षामध्ये निर्माण झालेली दरी एकाएकी वाढलेली नाही. पाच महिन्यांपूर्वी मालीवाल यांना पक्षाने राज्यसभेची उमेदवारी दिली. आता 'आप'ला त्या राज्यसभेवर नको आहेत; परंतु राज्यघटनेचे नियम पाहता त्यांना सहजासहजी दूर करता येत नाही. त्यातच केजरीवाल यांना अटक झाल्यानंतर पक्षाचे अन्य नेते भाजपवर तुटून पडत असताना मालीवाल मात्र परदेशी निघून गेल्या. भाजपविरोधातील संघर्षात त्या कोठेही नव्हत्या. त्यांना लोकसभा निवडणुकीत कोणतीही जबाबदारी देण्यात आली नव्हती. 'आप'च्या मते भाजप मालीवाल यांचा वापर करून घेत आहे. दिल्ली महिला आयोगाच्या अध्यक्ष राहिलेल्या मालीवाल यांना आता स्वतःवरच्या कथित अन्यायाविरोधात लढण्याची वेळ आली आहे. मालीवाल यांचा मुद्दा लोकसभेच्या निवडणुकीच्या काळात चर्चेत आला. त्यातच दावे-प्रतिदावे, वेगवेगळे व्हिडीओ आणि परस्परांविरोधातील तक्रारी 'आप'ची इभ्रत वेशीवर टांगणाऱ्या ठरत आहेत.

दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांच्या स्वीय सहाय्यकाने मारहाण केल्याचे स्वाती यांचे म्हणणे आहे. हा हल्ला झाला त्याच दिवशी त्या तक्रार नोंदवण्यासाठी पोलिस ठाण्यात गेल्या; परंतु तक्रार न देताच परतल्या. खासदार संजय सिंह यांनी मुख्यमंत्री कारवाई करतील, असे सांगून आश्वस्त केल्याचे सांगितले होते. परंतु त्यानंतर उत्तर प्रदेश दौऱ्यात केजरीवाल यांच्यासोबत मारहाण करणारा स्वीय सहायक बिभवकुमार दिसल्याने मालीवाल यांचे पित्त खवळले आणि 'आप'मध्ये नवे रण पेटले. बिभवकुमार यांच्यावर मालीवाल यांना मारहाण केल्याचा आरोप आहे. बिभवकुमार आणि मालीवाल हे दोघेही केजरीवाल यांच्यासोबत गेल्या दोन दशकांपासून काम करतात. त्यांनी स्वयंसेवी संस्थेचे काम केले आहे. मात्र आता त्यांच्यात इतका वाद का निर्माण झाला आणि मारहाणीच्या परस्परविरोधी फिर्यादी दाखल होण्यापर्यंत मजल का गेली, हे तपासले पाहिजे. मालीवाल यांना राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा द्यायला सांगून त्यांच्या जागी केजरीवाल यांना मद्य घोटाळ्यात न्यायालयीन मदत करणाऱ्या अभिषेक मनू संघवी यांची वर्णी लावण्याचे घाटत होते. त्याला त्या तयार नव्हत्या. त्यामुळे केजरीवालही त्यांच्यावर नाराज होते. मालीवाल परदेशातून आल्यानंतर केजरीवाल यांनी त्यांना भेट नाकारली होती. आता मालीवाल यांना राजकारणात रहायचे असेल तर अन्य कोणत्या पक्षात

**प्रमोद मुजुमदार**

जावे लागेल.

सध्या भाजपचे कार्यकर्ते या वादाला चांगलेच खतपाणी घालत आहेत. या घटनेच्या विरोधात निदर्शनेही केली जात आहेत. बिभव कुमार यांनी मारहाण केली की अन्य कुणी, सुरक्षारक्षक आणि बिभवकुमार यांच्याशी झालेल्या झटापटीत त्यांना दुखापत झाली का, हे तपासातून बाहेर येईलच. मात्र वस्तुस्थिती काहीही असली तरी भर निवडणूककाळात 'आप'ने इतर राजकीय पक्षांना मोठा मुद्दा दिला आहे. 'इंडिया' आघाडीमध्ये सामील असणाऱ्या पक्षांना या प्रकरणी भाष्य करणे अवघड झाले. प्रियांका गांधी यांनी आम्ही महिलांसोबत आहोत, एवढेच मोघम उत्तर दिले. मालीवाल यांनी बिभवकुमार यांच्या विरोधात सात पानी फिर्याद दाखल केली आहे; मात्र त्यांनी केजरीवाल यांचे नाव घेतलेले नाही. बिभव सुरुवातीला मनीष सिसोदिया यांच्यासोबत काम करत होते आणि मालीवाल या केजरीवाल यांच्या 'पीसीआरएफ'संस्थेच्या प्रमुख होत्या. हल्ल्याबद्दल प्रसारमाध्यमांमध्ये दाखवले गेले, त्यापेक्षा काही तरी वेगळे घडले असावे, असा कयासही बांधला जात आहे. मालीवाल या केजरीवाल यांच्या सर्वात ज्येष्ठ सहकारी होत्या. केजरीवाल सत्तेवर आल्यानंतर बिभव यांनी वैयक्तिक सचिव म्हणून काम सुरू केले. मालीवाल वर्षानुवर्षे दिल्ली महिला आयोगाच्या अध्यक्ष राहिल्या.

ताज्या संघर्षप्रकरणी उपस्थित होणारा आणखी एक मुद्दा म्हणजे आम आदमी पक्षात एका कुटुंबातील एकच व्यक्ती राजकारणात येऊ शकते. असे असेल तर सुनीता केजरीवाल यांना पुढे करण्यात येणे काही सदस्यांच्या मनात शंका निर्माण करणारे ठरत आहे. केजरीवाल यांची जागा घेऊ शकणारे पक्षात दुसरे लोक नाहीत का, असा प्रश्न उपस्थित करण्याची बुद्धी स्वाती यांच्याकडे आहे. स्वाती मालीवाल यांच्या ठायी मोठी महत्वाकांक्षा आहे. आज पक्षाशी संबंधित जुन्या लोकांमध्ये बिभवकुमार सर्वात प्रभावशाली आहेत. जवळपास सर्वच जुन्या लोकांचा यावर विश्वास आहे; पण स्वाती यांना हे मान्य नाही. अतिमहत्त्वाकांक्षा आणि सहकाऱ्यांच्या मनात निर्माण झालेले संशयाचे भूत यामुळे मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी मारहाणीचा शोचनीय प्रकार घडला. या संपूर्ण प्रकरणावर मौन बाळगणाऱ्या केजरीवाल यांच्याकडून या मुद्द्यावर सर्वात मोठी चूक होत आहे. त्यांनी या विषयावर काही तरी भूमिका घेतली पाहिजे. भलेही त्यांनी याला आम आदमी पक्षाचा अंतर्गत मामला म्हटले तरी चालेल. केजरीवाल गप्प बसतील, तितके हे प्रकरण अधिकच चिघळत राहील.

मालीवाल यांनी 'आप'चे राज्यसभा खासदार म्हणून राजीनामा देण्याच्या पूर्व मसुद्याच्या पत्रावर स्वाक्षरी करण्यास नकार दिल्याने बिभव यांनी हा हल्ला केला, असे सांगितले जात आहे. या वर्षी जानेवारीमध्ये मालीवाल यांची 'आप'च्या राज्यसभा सदस्य म्हणून निवड झाली. त्यांचा कार्यकाळ २०३० मध्ये संपणार आहे. त्यांनी या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आणि राज्यसभेच्या पोटनिवडणुकीसाठी निवडणूक झाली तर 'आप' तिकीट देईल, तो जिंकणार हे जवळपास निश्चित आहे. कथित दारू घोटाळ्यात केजरीवाल तुरुंगात गेल्यापासून 'आप' मध्ये काही बदल होत आहेत. केजरीवाल निर्विवाद 'बॉस' राहिले असले आणि 'आप'मध्ये त्यांचे मत अंतिम असले तरी काही नवीन सत्ताकेंद्रे उभी रहात आहेत. मालीवाल यांच्याबद्दल त्यांच्या खूप तक्रारी आहेत. मालीवाल यांना या मुद्द्यांवर केजरीवाल यांच्याशी चर्चा करायची होती. म्हणूनच त्या मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी गेल्या. त्यांना राज्यसभेच्या अध्यक्षांना उद्देशून दिलेल्या राजीनामापत्रावर स्वाक्षरी करण्यास सांगितले असता आपल्यालाच का राजीनामा द्यायला सांगितले जात आहे, राज्यसभेत पक्षाचे इतर नऊ सदस्य असतील तर त्यापैकी कुणी का नाही, असा सवाल त्यांनी केल्याचे सांगितले जाते. नजीकच्या काळात त्यांना आणखी काही पद देण्याचे आश्वासन देण्यात आले होते; मात्र त्यांनी राजीनामा देण्यास नकार दिल्याचे सूत्रांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी मारहाण होत असताना केजरीवाल घरी होते. त्यामुळे ड्रॉईंग रूममधून ओरडणे किंवा आवाज ऐकू आला नाही का, असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला.

'आप'ने मालीवाल यांना पक्षातून निलंबित केले तरी त्या पक्षाच्या खासदारपदी कायम राहतील; मात्र त्यांना सभागृहात मतदान करताना 'आप'च्या सूचनांचे पालन करावे लागणार आहे. अर्थात आम आदमी पक्षाने हकालपट्टी केली तर त्या आपोआप राज्यसभेच्या स्वतंत्र खासदार होतील. पक्षाच्या सूचनेला त्या बांधील राहणार नाहीत. ताज्या नाट्याच्या केंद्रस्थानी असलेल्या, 'आप'ने प्रसारीत केलेल्या व्हिडियोनुसार मालीवाल ड्रॉईंग रूममध्ये आरामात बसल्या असून सुरक्षा कर्मचाऱ्यांना धमकावताना दिसल्या आहेत. पोलिसांशी हुज्जत घालून नोकरीवरून काढण्याची धमकीही देताना त्या दिसतात. यानंतर त्या वेटिंग रूममध्ये गेल्या. तेव्हा बिभवकुमार यांना बोलावण्यात आले. त्यांनी सांगितले की मुख्यमंत्री केजरीवाल उपलब्ध नाहीत, त्यांना भेटता येणार नाही. त्यानंतर मालीवाल यांनी आतल्या खोलीत जाण्याचा प्रयत्न केला. मात्र बिभवकुमार समोर उभे राहिले तेव्हा त्यांनी जोरजोरात वाद घालण्यास सुरुवात केली. स्वाती यांनी त्यांना ढकलले. बिभवकुमार यांनी त्यांना आत जाऊ दिले नाही. त्यानंतर सुरक्षा कर्मचाऱ्यांना बोलावून त्यांना बाहेर काढण्यात आले. या प्रसंगी नेमका कोणत्या प्रकारचा संघर्ष झाला, हे समोर आलेले नाही. मालिवाल यांच्या डोक्याला कोणतीही जखम नाही किंवा त्यांच्यावर जबरदस्ती करण्यात आली नाही, असे व्हिडिओमध्ये दिसत आहे. म्हणजेच एकूण प्रकरणातील तथ्य पोलिस तपासानंतरच बाहेर येणार आहे. मात्र तोपर्यंत मालीवाल विरुद्ध पक्ष असा संघर्ष सुरू झाला असून ही हाणामारी भाजपच्या पथ्यावर पडत आहे.

आजकाल

# पुण्यातील अपघात- पोलिसांकडून अपेक्षा



पुण्यातील अगरवाल तपास पोलिसांनी गांभीर्याने करण्याची गरज आहे.

या प्रकरणातून अगरवाल सहज सुटला तर त्याचा दूरगामी परिणाम महाराष्ट्रावर होईल.

महाराष्ट्रात अनेक गँग कडे अल्पवयीन मुले आकर्षित झालेली तुम्हाला दिसून येतील. त्यांचा वापर रस्त्यावर एखाद्याला चिरडून मारण्यासाठी थंड डोक्याच्या लोकांकडून होऊ शकतो.

भविष्यातील धोके लक्षात घेऊन पोलिसांनी नीट आणि गांभीर्याने तपास करावा.

उद्या अशा अल्पवयीन पोरांकडून सुपाऱ्या वाजवल्या जाऊ शकतात. पोर्शे गाडी ऐवजी दूसरी गाडी असेल.

या गाडीखाली कुणीही येऊ शकतात. अगदी पोलिसही. त्यामुळे याचा तपास नीट होऊन कठोर कारवाई होईल याची जास्तीची जबाबदारी पोलिसांवरच आहे.

पोलिस हे अपवाद वगळता बदमाश आहेत. अपवाद म्हणजे तरी किती? ०.०१% .

यावर पोलिस पैशाला हपापलेले, मानमरातबासाठी खच्ची असलेले, मग्रुरी नसानसात भिनलेली असते पोलिसांच्या.

तुम्ही श्रीमंतांच्या घरातून असाल. चांगला राजकीय बॅकग्राऊंड असेल तर हे पोलिस पिझ्झा बर्गर च काय बुटही साफ करून देतील तुमचे.

न्यायालय काय घंटा करणार? जामीन मंजूर होण्यासारखी कलमं लावली तर जामीन होणारच की.

सगळ्याची मूळ समस्या पोलिस आहेत हे सांगायला कुणा ज्योतिषाची गरज नाही. किंवा प्लांचेट करायची गरज नाही.

क्रांतिसिंह नाना पाटील हे एका सभेत म्हणाले होते, खादी आणि खाकी या दोन गोष्टी बदमाश आहेत.

नानांचे ते शब्द तेव्हा ही खरे होते आजही खरे आहेत.

एवढ्या दिवस महाराष्ट्र पोलिसांचे एफ.आय . आर ऑनलाईन दिसायचे.

कालपासून तेही पोर्टल बंद दिसत आहे. काही काम चालू आहे की असंच बंद ठेवले आहे कल्पना नाही.

मात्र ढिगाने पैसा असला तर पोलिस खरेदी करता येतात.

तुम्ही कधीतर चूकून ट्राफिक पोलिसाच्या तावडीत सापडा. तो काय वागणूक देतो ते पहा आणि तेच अगरवाल ला काय ट्रीटमेंट दिली ते पहा. किंवा मागे ड्रग माफिया ची हेच लोक फाईव्ह स्टार सुविधा देत होते.

इथल्या सर्वसामान्य माणसाचा एकमेव गुन्हा आहे. त्याच्याकडे पैसा नसणे हाच गुन्हा आहे. तुझ्याकडे पैसा असेल तर तुला ते सोडवणारच!

वेदांत अगरवाल सोडून त्याच्या समवयस्क सर्वसामान्य मुलाला निबंध लिहायला लावला तर तो लिहेल की माझ्या पित्याला वेदांतच्या बापाएवढा पैसा मिळवता आला नाही, पण भविष्यात मी मिळवेन आणि एक दोन माणसं उडवेन आणि एका दिवसात जामीन मिळवेन.

लोकसंसद

## राजस्थानातील थरचे वाळवंट गायब होणार ?

हार्वर्ड विद्यापीठातील काही संशोधकाच्या मते येत्या शंभर वर्षात राजस्थानातील थरचे वाळवंट गायब होऊन तेथे सुपीक जमीन तयार होईल. मानवी हस्तक्षेपामुळे अनेक ठिकाणी असे बदल होत आहेत. आर्क्टिक विभाग सध्या जास्त गरम होत आहे. तो गरम होत असल्यामुळे जगभरात धुळीची पातळी कमी होत आहे. साहजिकच त्याचा परिणाम वाळवंटातील हवेवर होत आहे. अशामुळे भारत व पाकिस्तानातील थरच्या वाळवंटावर सुद्धा त्याचा परिणाम होऊ शकतो. असेच जर कायम राहिले तर तापमान वाढीपूर्वीची स्थिती निर्माण होऊन वाळवंटाच्या जागी सुपीक जमीन निर्माण होईल. थरचे वाळवंट पाकिस्तान, भारत या देशातली सिंध व पंजाब प्रांतात आहे. येथे उन्हाळ्यातील तापमान ५२ अंशापर्यंत जाते. या उलट हिवाळ्यात ते शून्य अंशाखाली जाते वारे सतत वाहतात व त्याच्या टेकड्या तयार होता व सतत त्या जागा बदलत राहतात. हे सारे परिणाम हवामान बदलाचे आहेत. तापमान वाढीमुळे अनेक समुद्र काठावरील शहरे बुडण्याचा सुद्धा धोका नजीकच्या काळात होऊ शकतो.

**शांताराम वाघ पुणे**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२९ मे**

**१८९६ :** लेखक आणि साम्यवादी विचारसरणी व राजकारणाचे अभ्यासक केशव पर्यंतचे शिक्षण त्यांनी घेतले होते. बेळगावात ते वकिलीही करत होते. मार्क्स गोविंद गोखले यांचा जन्म १६ सप्टेंबर १८९६ रोजी झाला. एम.ए.एल.एल.बी आणि एंजल्स या साम्यवादी नेत्यांचे ते कट्टर अनुयायी होते. तसेच ते निःस्सीम गांधीभक्त होते. स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाल्याबद्दल तब्बल आठ वेळा कारावास त्यांनी पत्करला होता. 'आर्यावर्तातील तेजस्वी रत्ने' है त्यांचे पहिले पुस्तक, यात देशभक्तांची संक्षिप्त चरित्रे आहेत. रशियाचा साम्यवाद हा त्यांच्या अभ्यासाचा विषय. साम्यवाद व रशिया या दोहोंच्या व्यासंगातून तीन हजार पानांच्या सप्तखंडात्मक असा 'सोव्हिएट रशियाचा सर्वांगीण सर्वोदय' हा ग्रंथ साकारला. या ग्रंथातून १९१७ ते १९४७ या काळातले रशियाचे समग्र राष्ट्रजीवन अभ्यासपूर्ण रितीने दिग्दर्शित केले आहे. तथापि हा ग्रंथ संकल्पनात्मक असून. ग्रंथाचे स्वरुप कोशवजा आहे. यातून रशियाचा गौरवच केला आहे. तथापि मराठी वाचकांना रशियाबाबतची अस्सल माहिती या ग्रंथातून मिळते. 'नवचीन' या ग्रंथातून क्रांतीकाळातील चीनचे चित्रण चित्रित केले आहे. याशिवाय गोखल्यांचे मराठीसह कानडी व इंग्रजी या भाषांवर प्रभुत्व होते. गोखले यांचे सारे लेखन स्वातंत्र्योत्तर भारतीय नागरिकांचे उद्बोधन व्हावे, अशा लोकशिक्षणाच्या भूमिकेतून झाले आहे. वयाच्या ५६ व्या वर्षी २९ मे १९५२ रोजी त्यांचे निधन झाले. **१९२१:-** कवी, ग्रंथसंपादक व ललितलेखक अशोक देवदत्त टिळक यांचा जन्म. रेव्हरंड नारायण वामन टिळक आणि लक्ष्मीबाई टिळक यांचे नातू. लक्ष्मीबाईच्या 'स्मृतिचित्र' ची अभिनव आवृत्ती त्यांनी संपादित केली आणि रेव्हरंड टिळकांवरचे 'चालता बोलता चमत्कार' हे पुस्तक लिहिले. 'अशोकदेवी', 'सावल्या','रुप्यांची झालर','आणि कविता' हे त्यांचे कवितासंग्रह तसेच 'विषय आजचाच','असे केले तर', 'मित्रहा','जरा वेगळा अँगल','टक्करमाळ' हे लेखसंग्रह प्रकाशित झाले. 'मन केवढं केवढ' हा व्यक्तिचित्रसंग्रह. तसेच स्मृतिचित्रांतून सुटलेले धागे गुंफणारे 'शांतिसदन' हे पुस्तकही त्यांनी लिहिले होते. त्यांचे निधन २००९च्या सप्टेंबरात झाले. **१९२९:-** साहित्यिक डॉ.राम म्हैसाळकर यांचा जन्म. यांच्या ग्रंथ संपदेत 'एक होता गंधर्व' हे बालगंधर्वाचे चरित्रफ,'उत्तर' हे नाटक आणि 'धीरवीरपुरुषपदा-नाटककार खाडीलकर यांच्या नाटकावरील टीकात्मक नाटयप्रयोग अशी ग्रंथसंपदा. तसेच अनेक बंगाली कवितांचा त्यांनी भावानुवाद केला आहे **१९३२:-** लेखक डॉ. वा. ना. मेश्राम यांचा जन्म. यांच्या ग्रंथसंपदेत 'डॉ. आंबेडकर-आनंद कौसल्यायन','इथे पर्वतीचिये नगरी', 'दलितांचे जग वंदन व शिष्टाई','धम्मपद प्रबोधिनी','सम्राट अशोक आणि त्याचे शिलालेख','तिबेट आणि नेपाळ येथील बौध्द संस्कृती','मनुस्मृतीची न जळलेली पाने तसेच काही अनुवादीत साहित्य त्यांच्या नावावर आहे. **१९३३:-** विविध संशोधनपर नियतकालिकांतून सातत्याने लेखन करणारे, संस्कृत काव्यशास्त्र, प्राचीन तात्त्विक ग्रंथांची रचनापध्दती, पाश्चात्य शैलीशास्त्र, प्राच्य विद्या आदींचे व्यासंगी, विविध भाषांचे जाणकार प्रा. डॉ. वामन केशव लेले यांचा जन्म. ह्यांचे शंभर एक लेख पन्नास एक शोध निबंधासह,'वाग्विलास'हा संपादित काव्यसंग्रह. 'उच्च जीवनाची साधना','उद्गार आणि बोधवचने','कलादर्पण','कलेतिहास व रसग्रहण','काव्य, शास्त्र आणि संस्कृती', 'गजेंद्रमोक्ष','भाषा, साहित्य व शास्त्र','काही विचार''भारतीय काव्य शास्त्राची उत्क्रांती','मुक्तेश्वरकृत स्फूटकाव्य','ललित लेखन व शैली', 'ज्ञानेश्वरीचा शास्त्रीय अभ्यास' आदी ग्रंथ त्यांच्या संशोधक वृत्तीची साक्ष देतात. **१९४२:-** चरित्र लेखक पेशाने इंजिनीअर कवी घनश्याम वासुदेव यांचा जन्म. 'इजिप्तचे अध्यक्ष नासर' यांचे चरित्र त्यांनी लिहिले. **१९४९:-** बोधकथाकार प्राचार्य प्रकाश बोकील याचा जन्म. 'बोलक्या भिंती' या त्यांच्या पुस्तकाला शासनाचा बालसाहित्य पुरस्कार. याशिवाय दै.सकाळ मध्ये प्रसिध्द घेणाऱ्या त्यांच्या बोधकथांचे पुस्तकरुपात प्रसिध्द. **१९५२:-** लेखक आणि साम्यवादी विचारसरणी व राजकारणाचे अभ्यासक केशव गोविंद गोखले यांचे निधन. 'आर्यावर्तातील तेजस्वी रत्न' हे त्यांचे पहिले पुस्तक. यात देशभक्तांचा संक्षिप्त चरित्र आहेत. 'रशियाचा साम्यवाद' हा त्यांच्या अभ्यासाचा विषय. साम्यवाद व रशिया या दोहोंच्या व्यासंगातून तीन हजार पानांच्या सप्तखंडात्मक असा 'सोव्हिएट रशियाचा सर्वांगीण सर्वोदय' हा ग्रंथ साकारला. 'नवचीन' या ग्रंथातून क्रांतीकाळातील चीनचे चित्रण चित्रित केले आहे. याशिवाय गोखल्याचे मराठीसह कानडी व इंग्रजी या भाषेवर प्रभुत्व होते. **१९५९:-** महिलांच्या समस्यांना वाहिलेल्या 'आकांक्षा' मासिकाच्या संपादक, प्रकाशक, लेखक आणि समाजसेविका अरुणा पंजाबराव सबाने यांचा जन्म. यांच्या ग्रंथसंपदेत 'जखम म नावरची','अथांग','अनुबध' हे कथासंग्रह. 'विमुक्त','मुन्नी' ह्या कादंबऱ्या,'स्त्रीवाद-एक दृष्टीकोण' या ग्रंथासह 'बहिणाबाई चौधरी','आंबेडकर आणि स्त्री', 'साहित्यातून समाजाकडे','प्रतिभावंत' ही संपादने अशी ग्रंथसंपदा. **२००३:-** लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या सविता कबिर उर्फ माई आंबेडकर यांचा जन्म. महापुरुषाची पत्नी म्हणून जगताना आलेल्या अनुभवांचे चित्रण त्यांनी 'डॉ. आंबेडकरांच्या सहवासात' या पुस्तकातून केले.

**- संजय वझरेकर**
९९७५५७६६७५

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२९ मे

१) श्री.शशिकांत सोपान पोरे, श्रीबाग-३, अलिबाग, २९-५-१९४९




## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.


**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**


# ७२ गावांना दरडींचा धोका

**। महाड । वार्ताहर ।**

**तालुक्यातील ७२ गावाना दरडीचा धोका आहे. पावसाळा तोंडावर आला की प्रशासनामार्फत दरवर्षी प्रमाणे दरड प्रवण गावांमध्ये जाऊन जनजागृती करण्याला वेग येतो आणि स्थलांतराचे आराखडे कागदावरच राहतात. आता जिल्हा आपत्ती प्रशासन पुन्हा एकदा सक्रिय झाले आहे.**



तालुयात सर्वात पहिली दरड पारमाची येथे सन १९९४ मध्ये कोसळल्यानंतर गेल्या ३० वर्षात शासनाला या दरडग्रस्त गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सोडवता आला नाही. जुलै २०२१ मध्ये तळीये कोंडाळकरवाडी येथे दरड कोसळल्यानंतर पुन्हा तालुक्यातील दरडग्रस्त गावांच्या स्थलांतराचा प्रश्न ऐरणीवर आला होता. मात्र दोन वर्षानंतर दरडग्रस्त गावांच्या स्थलांतराचा प्रश्न जैसे थेच आहे. महाड तालुयातील पारमाची या गावांमध्ये १९९४ मध्ये पहिली दरड कोसळल्यानंतर रायगड जिल्ह्यामध्ये नैसर्गिक आपत्तीला सुरुवात झाली. २००५ च्या नैसर्गिक आपत्तीमध्ये महाड तालुक्यामध्ये दासगाव, जुई, कोंडीवते व रोहन गावामध्ये दरड कोसळून १९२ जणांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर जिओ लॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या वैज्ञानिकांनी रायगड जिल्ह्यातील गावांचे सर्वेक्षण करण्यास सुरुवात केली होती.

२०२१ मध्ये तळिये येथे दरड कोसळून ८६ जणांचा मृत्यू झाला होता. तर गतवर्षी इर्शाळवाडीत दरड कोसळून ८४ जण गाडले गेले. दरवर्षी जिल्ह्यातील दरडग्रस्त गावांचे सर्वेक्षण केल्यानंतर वैज्ञानिकांकडून संभाव्य दरडग्रस्त गावांची यादी प्रसिद्ध केली जाते. जुलै २०२१ मध्ये तळीये येथे दरड कोसळली मात्र या गावाचा दरड प्रवण गावांमध्ये समावेश नव्हता. त्यामुळे पुन्हा महाड तालुक्याचा भुवैज्ञानिकांकडून सर्व्हे करण्यात आला. त्यानुसार पूर्वीच्या ४९ गावांमध्ये आणखी २३ गावांचा समावेश करण्यात आला. तळीयेची घटना ताजी असेपर्यंत प्रशासनाकडून दरडग्रस्त गावांची पाहणी करून तात्पुरती निवारा व्यवस्था व कायमस्वरूपी पुनर्वसनाचे प्रस्ताव पाठवण्यात आले. मात्र काळ जसा पुढे सरकला तसा प्रशासनाला देखील या गावांच्या पुनर्वसनाचा विसर पडला. पावसाळा तोंडावर आला की, दरवर्षी प्रमाणे दरडप्रवण गावांमध्ये जाऊन जनजागृती करण्याला वेग येत असतो. या गावातील रहिवाशांकडूनही आपली पारंपारिक गावातील घरे आणि शेतीवाडी सोडण्यास फारसा उत्साह नसतो. त्यामुळे प्रशासनाकडून कितीही आवाहन विनंत्या केल्या, तरी हे ग्रामस्थ आपली घरे सोडत नाहीत. यावर्षी हवामान खात्याने सरासरी पेक्षा जास्त पावसाचा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे दरडग्रस्त गावांतील जनतेचा धोका वा वाढला आहे.

# जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्ताने जनजागृती

**। कोर्लई । वार्ताहर ।**

महाराष्ट्र राज्य तंबाखू मुक्त करण्याच्या हेतूने सार्वजनिक आरोग्य विभाग व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राज्य स्तरावरुन ३६ जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग रायगड जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने व अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शितल घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली १ मे ते ३१ मे २०२४ या कालावधीत ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, शाळा महाविद्यालय व शासकीय कार्यालयात तंबाखू व सिगारेट यांच्या दुष्परिणामांची माहिती देणारे जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्यात येत असून मुरुडच्या ग्रामीण रुग्णालयात (लेडी कुलसुम बेगम हॉस्पिटल) वैद्यकीय अधीक्षक डॉ. उषा चोले यांच्या उपस्थितीत जागतिक तंबाखू विरोधी दिवस साजरा करण्यात आला.



जिल्हा रुग्णालय जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षाचे समाज सेवक सुशील साईकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. उषा चोले, वैद्यकीय अधिकारी डॉ. कदम, दंत चिकित्सक डॉ.शेखर वानखेडे मान्यवर उपस्थित होते. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन कसे घातक आहे. हे सांगून कोटपा-२००३ कायदा व कॅन्सर वॉरियर्स सेवा बाबत समाज सेवक सुशील साईकर यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली. दंत चिकित्सक डॉ. शेखर वानखेडे यांनी तंबाखू व सिगारेट सेवनामुळे होणारे दुष्परिणाम व मुख कॅन्सर विषयक माहिती दिली.

# कामोठे ब्रिजसमोरील सिग्नल बंद

**। पनवेल । वार्ताहर ।**

सायन-पनवेल महामार्गावरील कामोठे येथील ब्रिज समोर असलेले सर्व सिग्नल मंगळवारी बंद होते. त्यामुळे त्या ठिकाणी अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. तातडीने सिग्नल सुरु करुन वाहतुकीची होणारी गैरसोय दुर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



सध्या सुट्ट्यांचा हंगाम सुरु आहे. त्यामुळे रस्त्यावर वाहनांची वर्दळ वाढली आहे. सायन-पनवेल या मार्गावरुन गोव्याकडे तसेच पुण्याकडे मोठ्या प्रमाणात वाहनांची रहदारी सुरु असते. सध्या सकाळी आणि सायंकाळनंतर या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहने येत आहेत.

सायन-पनवेल मार्गावरील कामोठे ब्रिज समोरील सिग्नल यंत्रणा बंद पडली आहे. त्यामुळे वाहतुकीची फार मोठी समस्या निर्माण झाली होती. चारही बाजूने एकाच वेळी वाहने ये-जा करत असल्याने अपघाताची शक्यता निर्माण झाली होती. या कालावधीत वाहतुक पोलिस दिसून आले त्रणेने येथील सिग्नल लवकर सुरु करावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

## उर्दू शाळेचा निकाल

**अलिबाग :** नगर परिषद उर्दू माध्यमिक शाळेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. या परिक्षेत इफ्फत कमरोद्दीन शेखने ७९.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला, शमा कासिम शेखने ७५.४० टक्के गुण मिळवून द्वितीय, तर मरियम मौला शेखने ७१.६० टक्के मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. प्रथम व द्वितीय श्रेणीन एकूण २० विद्यार्थ्यांनी गुण मिळवले. अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, अ‍ॅड. मानसी म्हात्रे, वृषाली ठोसर मुख्य कार्यकारी अधिकारी अंगाई साळुंखे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



**■ मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर मंगळवारी ( ता.२८) मेगा ब्लॉक मुळे यशवंतराव चव्हाण प्रवेश द्वारावर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती.**
**(छायाचित्र : राजेश डांगळे)**

पान १ वरून

## समिती गठीत, तीन आठवड्यांची मुदत

केले असेल या सगळ्या बाबींचासुद्धा आढावा घेतला जाणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डोंबिवलीला भेट दिली. त्यावेळी त्यांनी काही निर्देश दिले आहेत. त्याचे तंतोतंत पालन या समितीकडून आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून केले जाणार असल्याची माहिती महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी मंगळवारी (दि.२८) मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

दोन वर्षापूर्वी एमआयडीसी आणि त्यातील केमिकल कंपन्यांचे स्थलांतरण करण्याचा निर्णय झाला होता. २०२२ मध्ये ठराव देखील झाला होता. मागील एक वर्षापासून पाताळगंगा, जांभवली येथे जमीन अधिग्रहण करण्याची प्रक्रिया देखील सुरू करण्यात आली आहे. परंतु आचारसंहितेमुळे ते थांबले होते. आता निवडणूक आयोगाला पत्र लिहून विनंती करणार आहोत की, उद्योजकांना जागा वाटप करण्याची परवानगी द्यावी आणि त्यासाठी प्रक्रिया सुरू करावी, असा निर्णय आज बैठकीत झाला असल्याचेही सामंत यांनी सांगितले.

डोंबिवली स्फोटामध्ये सुमारे १३ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. वाणिज्य नुकसान १२ कोटी आणि रहिवासी नुकसान १ कोटी ६६ लाख आहे. हे सर्व नुकसान भरून काढण्यासाठी महाराष्ट्र सरकार सकारात्मक आहे. मृत व्यक्ती आणि गंभीर दुखापत होऊन उपचार सुरु असणाऱ्यांचाही खर्च सरकार करणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याबाबत आधीच सूचना दिल्या आहेत. ज्या कंपन्यांचा विमा आहे, त्यांना सध्या तरी मदत करण्याची गरज वाटत नाही. भविष्यात महाराष्ट्रातील एमआयडीसी आणि केमिकल झोनमधील कंपन्यांचे स्थलांतरण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. ज्या कंपन्यांनी नियमांचे उल्लंघन केले आहे, त्यांना त्या संदर्भातील नोटीस दिल्या गेल्या आहेत. या कंपन्या स्थलांतर करताना त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही, याची काळजी राज्य सरकार घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## कर्जतमध्ये शीतयुद्ध

अधिकारी तसेच लोकप्रतिनिधी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन करून त्यांची फसवणूक करून धार्मिक विषयात विकासकामे करताना चुकीची पद्धती अवलंबली गेली. तसेच धार्मिक भावना दुखावल्या म्हणून शासनाच्या निधीचा गैरवापर केल्या प्रकरणी आयपीसी कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात यावा. यासाठी आवश्यक परवानगी पोलिसांनी शासनाकडून मिळवावी, असेही ते म्हणाले.

कर्जतमध्ये भयानक घटना घडत आहेत. कर्जतमध्ये एका महिलेवर हल्ला झाला. तो गुन्हा एलसीबीकडे न देता त्याचा तपास कर्जत पोलिसांनीच केला. तसेच पळसदरी तलावात एक प्रेत सापडले आहे. याबाबत पोलिसांनी काय तपास केला? पूर्वी भाजपच्या कार्यकर्ते असलेल्या आणि सध्या शिंदे गटात काम करणाऱ्या आरती माळवे यांचा पळसदरी रस्त्यावर अपघात झाला की घातपात झाला? त्या जर शिंदे गटाच्या कार्यकर्त्या होत्या. तर स्थानिक आमदारांनी याबाबत आवाज का उठवला नाही, याबाबत सीबीआयतर्फे चौकशी करावी व या घटनेची मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी गांभीर्याने दखल घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

रायगडमधील प्रशासन स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांच्या दहशतीखाली काम करत असून कर्जत विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या पोलीस ठाण्यांमध्ये गुन्ह्यांची संख्या वाढत आहे. तसेच पोलीस ठाण्यात पोलीस अधिकारी यांची बदली होताना जी डायरी लिहिली जाते त्या डायरीमध्ये काय लिहिले आहे. याचा तपास शासनाने, पोलीस अधिकाऱ्यांनी करावा, असेही त्यांनी सांगितले.

कर्जत शहरात भाई हुतात्मा कोतवाल व्यायाम शाळेच्या समोर असलेल्या खुल्या मैदानात व्यायामशाळा बांधण्याच्या नावावर व्यावसायिक दुकान गाळे बांधले आहेत. याची चौकशी करावी. याबाबत गेली चार-पाच वर्ष तक्रार करत आहे, मात्र जिल्हा प्रशासन, जिल्हा पोलीस अधिकारी कोणतीही चौकशी करत नाहीत. त्यामुळे न्यायालयाकडे धाव घ्यावी लागली आहे. हे सर्व आमदार महेंद्र थोरवे यांच्या दहशतीने सुरू असल्याचा आरोप अ‍ॅड. जोशी यांनी पत्रकार परिषदेमध्ये केला.

## स्थानिकांच्या विरोधानंतर सिडकोचे पथक माघारी- बाळाराम पाटील

बाळाराम पाटील, शिवसेना उबाठा गटाचे नेते बबन पाटील, सुदाम पाटील, माजी नगरसेवक गोपाळ भगत, सरस्वती काथारा, ज्योती मोहिते, सूर्यकांत म्हसकर, अरविंद कडव, अनंता भगत, दिपक पाटील व ग्रामस्थ बहुसंखेने उपस्थित होते.

स्थानिकांकडून करण्यात आलेल्या तीव्र विरोधानंतर सिडकोस कारवाई थांबवणे भाग पाडले. सदर कारवाई थांबवण्यासाठी माजी आमदार बाळाराम पाटील यांनी अथक प्रयत्न केल्याबद्दल ग्रामस्थांकडून माजी आमदार पाटील यांचे आभार मानले.तसेच कारवाई थांबवणयासाठी सहकार्य केल्याबद्दल पोलिसांचे आभार मानण्यात आले. कळंबोली येथील प्रकल्प ग्रस्ताची ३५/४० वर्षा पूर्वीची घरे अनधिकृत ठरवून त्या घरांवर अचानक कारवाई करण्यासाठी सिडको अतिक्रमण विभागाचे अधिकारी पोलीस फौज फाट्यासह आले होते.

### पुणे अपघात प्रकरण

## दडपण्याचा राज्यसरकार प्रयत्न

सरकारी यंत्रणेच्या माध्यमातून प्रयत्न झाले. पुण्याच्या प्रकरणात गर्भश्रीमंत व्यक्तींना वाचवण्यासाठी राजकीय हस्तक्षेप झाल्याचे दिसत असल्याने राज्याच्या यंत्रणेवर विश्वास नाही. पुण्याच्या अपघात प्रकरणाची चौकशी सीबीआयमार्फतच झाली पाहिजे, अशी आग्रही मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली.

दादर येथील टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपा सरकारचा समाचार घेतला. ते पुढे म्हणाले की, पुण्यात गर्भश्रीमंत व्यक्तीच्या अल्पवयीन मुलाने कारखाली दोघांना चिरडले, त्याआधी त्याने मद्यपान केले होते. यावेळी त्याच्यासोबत एका आमदाराचा मुलगाही होता, तो कोण हे समजले पाहिजे. पुण्यातील घटनेत राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःच्या वकीलीचा वापर आरोपींना वाचवण्यासाठी केला. पुण्यात ड्रग्जचा अवैधधंदा जोरात सुरु आहे. पुणे व नागपूर शहरातही अवैध पबने थैमान घातले आहे. कार अपघात प्रकरणानंतर पुण्यातील ३६ अवैध पब पाडावे लागले.

गुजरातमधून मोठ्या प्रमाणात ड्रग्ज महाराष्ट्रात आणून तरूण पिढीला बरबाद करण्याचे पाप भाजपाने केले आहे. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणी खुलासा करावा व या प्रकरणी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भूमिका संशयास्पद वाटते. त्यांचा राजीनामा घ्यावा. नागपूर या गृहमंत्र्यांच्या शहरातही दोन मुलींनी दोन युवकांना गाडीखाली चिरडून मारले. तरीही त्यांना १० तासात जामीन मिळाला. जळगावातही गाडीखाली चिरडण्यात आले व त्यातही आरोपीला वाचवण्याचा प्रयत्न झाला.

पुण्याच्या ससून हॉस्पिटमधील डॉ.अजय तावडेने आरोपीच्या रक्ताचे नमुने बदलले. ससूनमध्ये ड्रग माफिया ललित पाटीलला सर्वसोयी सुविधा पुरवण्यात आल्या होत्या. येथून ललित पाटील पळूनही गेला होता. ससूनचे डॉक्टर तावरे यांना अधिक्षक पदासाठी नियुक्त करावे, यासाठी एक मंत्री व आमदार यांनी शिफारस केली होती. तो मंत्री व आमदार कोण हे जनतेला समजले पाहिजे. सत्ताधारी पक्षाचा हस्तक्षेप सर्व क्षेत्रात वाढला असून गुन्हेगार मोकाट सुटले आहेत. इंदापूरमध्ये तहसीलदारांवर जीवघेणा हल्ला करण्यात आला. गुन्हेगारांची अशी हिम्मत होतेच कशी, राजकीय आशीर्वाद असल्याशिवाय असे होऊ शकत नाही. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले आंबेडकर यांच्या राज्याला बदनाम करण्याचे पाप भाजपाने केले आहे, असा जोरदार आरोप नाना पटोले यांनी केला.

शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृती आणण्याचा डाव भाजपाने रचला असून कोणत्याही परिस्थितीत काँग्रेस हे होऊ देणार नाही. मनुस्मृतीत महिलांना काहीच स्थान नाही. संविधान हटवून त्या जागी मनुस्मृती आणण्याचा प्रयत्न आहे, तो कदापी यशस्वी होणार नाही. मनुस्मृतीचा अभ्यासक्रमात समावेश खपवून घेणार नाही, असा इशाराही नाना पटोले यांनी दिला आहे. या पत्रकार परिषदेला काँग्रेसचे राज्यसभा खासदार चंद्रकांत हंडोरे, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष आमदार वजाहत मिर्झा, माजी खासदार हुसेन दलवाई आदी नेते उपस्थित होते.

## शेकाप चिटणीसपदी अस्लम राऊत

चिटणीसपदी ज्येष्ठ नेते अस्लम राऊत यांची एकमताने निवड करण्यात आली.

या बैठकीत रमेश मोरे यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती पदाचा राजीनामा द्यावा,अशी चर्चा झाली. आपली तालुका चिटणीसपदी निवड झाल्याबद्दल अस्लम राऊत यांनी उपस्थित सर्व कार्यकर्त्यांचे मनापासून आभार व ऋण व्यक्त केले. राऊत पुढे म्हणाले की, पक्षाचे ज्येष्ठ नेते स्व.भाऊ प्रभाकर पाटील यांच्यासोबत रायगड जिल्हा परिषदेत काम करण्याची संधी मिळाली. भाऊंच्या नेतृत्वाखाली त्याकाळात पक्षाचे एकनिष्ठेने काम केले. शेकाप हा गोरगरीब, शेतकरी व कष्टकऱ्यांचा पक्ष आहे. राजकारणाच्या माध्यमातून समाजकारण करणे हा पक्षाचा उद्देश आहे. आगामी निवडणुका समोर ठेऊन आपले नेते आमदार जयंत पाटील यांच्यासह पक्षाचे सर्व प्रमुख नेते मंडळी यांचा हात बळकट करण्यासाठी कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागा. पक्षाची ध्येय-धोरणे व पक्षामार्फत तालुक्यात झालेली विकासकामे तळागाळातील जनतेपर्यंत पोहचवून पक्ष संघटन अधिकतम मजबूत करूया. सर्वांना सोबत व विश्वासात घेऊन जसे आजपर्यंत पक्षाचे प्रामाणिकपणे काम केले आहे, तसेच काम या पुढे हि केले जाईल असे कार्यकर्त्यांना राऊत यांनी आश्वासित केले.

या बैठकीला ज्येष्ठ नेते हसनमिया बंदरकर, नामदेव शिंदे, रावसाहेब महाडिक, बाळकृष्ण आंबुर्ले, सखाराम जाधव, पक्षाचे तालुका कार्यालयीन प्रमुख राजेश कासारे, स्वप्नील दसवते, देगाव उपसरपंच दिनेश गुगले, मोर्बा माजी सरपंच विलास गोठल, माजी उपसरपंच अमोल मोहिते, निजाम फोपळूणकर, नितीन वाघमारे, अ‍ॅड.मुसद्दीक राऊत, चंद्रकांत सत्वे, रमेश बक्कम, दिलीप उतेकर, नरेश दळवी, तुळाजी दिवेकर, बाळा पेडणेकर, राकेश पातेरे, संतोष कडू, ईश्वर मोरे दिलीप तांबट, अक्षय जाधव, निलेश डोंगरे, शैलेश यादव आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धारावीत इमारतीला आग, सहाजण जखमी

जळून खाक झाले. तसेच, इतर वस्तूंचे मोठे नुकसान झाले. आगीची वाढती तीव्रता लक्षात येताच अग्निशमन दलाकडून पहाटे ४ वाजून ४० मिनिटांनी आगीला क्रमांक दोनची वर्दी देण्यात आली. दरम्यान, मोठ्या प्रयत्नानंतर दुर्घटनेत अडकलेल्या रहिवाशांना बाहेर काढण्यात आले. त्यात सलमान खान (२६), मनोज (२६), अमजद (२२), सल्लाउद्दिन (२८), सैदुल रहमान (२६), रफिक अहमद (२६) आदी सहाजण जखमी झाले. उपचारासाठी तात्काळ त्यांना नजीकच्या शीव रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. प्रयत्नांची पराकाष्ठा करत सकाळी ७ वाजून ४० मिनिटांनी आगीवर नियंत्रण मिळविण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले.

## जितेंद्र आव्हाड करणार मनुस्मृतींचे दहन

समावेश करण्यासंदर्भातल्या सरकारच्या निर्णयाविरोधात जितेंद्र आव्हाड यांनी सर्वांना एकत्र येण्याचे आव्हान केले आहे. ज्या मनुस्मृतीने स्त्रियांचे अधिकार नाकारले, ज्या मनुस्मृतीमुळे आपले पूर्वज ५००० वर्ष त्रासात जगले, तीच मनुस्मृती पुन्हा एकदा हे सरकार आणत आहे, याचा तीव्र विरोध व्हायला हवा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या ठिकाणी या मनुस्मृतीचे दहन केले. त्याच ठिकाणी पुन्हा एकदा आपण जाऊन याचे दहन करणार आहोत आणि सरकारचा निषेध करणार आहोत. त्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहा, असे आवाहन आव्हाड यांनी केले आहे.

सत्ताधारी मागच्या दाराने त्यांच्या मनातील गोष्ट पूर्ण करु पाहत आहेत. आमच संविधान म्हणजेच मनुस्मृती, असे म्हणणारे जेव्हा सत्तेत येतात तेव्हा काय घडते, त्याचे उदाहरण म्हणजे पाठ्यपुस्तकात मनुस्मृतीचा समावेश होत आहे. ज्या मनुस्मृतीने भारताच्या वाटोळं केले, समाजात दुही माजवली आहे, समाजामध्ये चातुवर्ण्याचा समावेश केला, जातीभेद निर्माण केला, स्त्रियांना तर सर्वात घाणेरडी वागणूक घेण्याची पद्धती या मनुस्मृतीने जन्मला घातली, ती मनुस्मृती परत आणली जात आहे.

जे लोक १९५० साली म्हणाले की, आम्हाला तुमचे संविधान मान्य नाही, आमचे संविधान म्हणजे मनुस्मृती. तेच लोक आता मनुस्मृती आणण्याचा प्रयत्न करत आहेत. तुम्हाला आणि आम्हाला संविधान वाचवायचे आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२७ मध्ये मनुस्मृती दहन केले आणि १९५० मध्ये संविधान जन्माला घातले. त्यासाठी आपण महाडला जात आहोत. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मरण करून आपण मनुस्मृतीच दहन करतोय. संविधानासाठी दो बलिदान, असे जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे.

## अ‍ॅड. सरोदे बाजू मांडणार

पुर्नतपासणी करण्याची मागणी न्यायालयाकडे केली आहे.

शिरगांवचे सरपंच ओझर्डे यांची न्यायायलीन प्रकरणात बाजू मंडण्यासाठी अ‍ॅड. सरोदे मंगळवारी महाड न्यायालयात आले होते. त्या प्रकरणाच्या सुनावणीनंतर त्यांनी चवदार तळे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळेस ते बोलत होते. आपली लढाई आमदार भरत गोगावले अथवा विकास गोगावले या व्यक्तींविरोधात नसून अशा गुंड प्रवृत्ती व मनोवृत्ती विरोधात आहे. सत्तास्थानी असलेले लोक सत्तेचा वापर करुन गुंडगिरी करतात. ही प्रवृत्ती धोकादायक आहे. या सर्व प्रकरणाचा तपास नव्याने सुरु करण्यात यावा, अशी मागणी आपण न्यायालयासमोर केली असल्याचे अ‍ॅड. सरोदे यांनी सांगितले.

## कोकण समृद्धी मार्गाला गाजर!

जवळपास ९० किलोमीटर अंतराच्या पहिल्या टप्प्याचे चौपदरीकरणाचे काम सुरु करण्यात आले. त्यानंतर इंदापूरपासून पुढे दुसऱ्या टप्प्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. या महामार्गाचे काम गेली १४ वर्ष रखडले असून पळस्पे ते इंदापूर या पहिल्या टप्प्याचे कामही अजून व्यवस्थित पूर्ण झालेले नाही. इंदापूरपासून पुढे असणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील माणगावचा बायपासचा प्रश्नही खितपत पडला आहे. बायपासच्या कामाची रखडपट्टी यामुळे माणगाव शहरात सातत्याने शनिवार, रविवार सुट्टीच्या दिवशी व सणांच्या दिवशी वाहनांच्या १० किमीपर्यंत रांगा लागून वाहतूक कोंडी होत असते. सुट्टीच्या व सणाच्या दिवसात कोकणात मोठ्या प्रमाणात पर्यटकांच्या गाड्या तसेच सणानिमित्त गावाकडे कोकणात चाकरमानी वाहनांनी येतात. माणगाव शहरात वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे बाजारपेठेतून बाहेर पडताना त्यांच्या नाकीनऊ येतात. महामार्गावर काम करताना केलेली लेन कटिंग बऱ्याच वेळा जीवघेणी ठरते. अशीच एक लेन कटिंग काही महिन्यांपूर्वी एका कार चालकाच्या रात्रीच्या वेळेस लक्षात न आल्याने माणगाव जवळील रेपोली गावच्या हद्दीत त्या कारला अपघात होऊन कारमधील सर्व १० जण मृत्यूमुखी पडले होते. यांसारखे अनेक भीषण अपघात महामार्गावर होत असतानाही लोकप्रतिनिधी, राज्यकर्ते या महामार्गाच्या कामाकडे गंभीर्याने पाहताना दिसत नाहीत.

रायगड जिल्ह्यातील पत्रकारांसह अनेक संस्था-संघटना तसेच सामाजिक कार्यकर्ते यांनी वेळोवेळी आंदोलने केली होती. तरीही या महामार्गाचे काम १४ वर्ष रखडले आहे. कोकणातील जनता हि संयमी असल्याने याचाच फायदा राज्यकर्ते व लोकप्रतिनिधी घेत आहेत. आता या प्रश्नाबाबत कोकणी माणसाचा संयम सुटू लागला आहे. राज्यकर्ते या महामार्गावरून सातत्याने जात असतात. परंतु, या प्रश्नाकडे ते गांभीर्याने पाहताना दिसत नाहीत.

या महामार्गाच्या नंतर समृद्धी महामार्गाच्या कामाला सुरुवात होऊन तो महामार्ग होऊन सुरूही झाला आहे. मग १४ वर्ष उलटूनही मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम अजून पूर्ण का होत नाही असा सवाल जनतेतून होत आहे.

## निवडक

### दारुबंदी विभागाची नजर

**पनवेल :** पुण्यात घडलेल्या ड्रंक अँण्ड ड्राईव्हच्या घटनेची पुनरावृत्ती पनवेल परिसरात होवू नये यासाठी परिमंडळ २ हद्दीतील सर्वच पोलीस ठाण्यामध्ये असलेले बार, वॉईन शॉप व पब वर पोलिसांसह दारुबंदी विभागाचे कडक लक्ष आहे. पुण्यातील घटनेमुळे पोलिसांसह दारुबंदी विभाग, आरटीओ आता सतर्क झाले असून बार, वॉईन शॉप व पबमध्ये अल्पवयीन मुलांवर नजर ठेवण्यात येत आहे. त्याचप्रमाणे रात्रभर सुरू असणाऱ्या डान्स बारवरसुद्धा पोलिसांचे लक्ष आहे.

### दोन दुचाकींची चोरी

**पनवेल :** पनवेल परिसरातून दोन दुचाकी चोरीस गेल्याची घटना घडली आहे.आदई येथे राहणारे रणजित रतन सिंग यांनी त्यांची मोटार सायकल पॅनेसिया हॉस्पिटलजवळ असलेल्या मेडीकल शॉपच्या बाहेर उभी ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर मोटार सायकल चोरुन नेली आहे. तर दुसऱ्या घटनेत करण दोरे यांनी त्यांची दुचाकी खारघर रेल्वे स्टेशनच्या बाहेर यशस्वी फाईन डाईन हॉटेल समोर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी दुचाकी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेलमधून तरुणी बेपत्ता

**पनवेल:** राहत्या घरातून कोणास काहीही न सांगता एक तरुणी कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. नेहा रवींद्र पुजारी (१९) असे या तरुणीचे नाव असून चेहरा गोल, रंग गोरा, अंगाने मध्यम, उंची ४ फुट ९ इंच, डोक्याचे केस काळे वाढलेले, डोळे काळे मोठे असून गळ्यामध्ये सोन्याची साखळी, पायात काळ्या रंगाची चप्पल सोबत मोबाईल फोन असून या मुलीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस यांच्याशी संपर्क साधावा.

### ज्येष्ठ नागरिक बेपत्ता

**पनवेल :** घराबाहेर फेरफटका मारण्याकरता गेलेले ६१ वर्षीय आदेश गजानन शेट्टे (रा. सेक्टर ४, नवीन पनवेल) हे घरी परत न आल्याने ते हरवले असल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली.त्यांची उंची ५.५ फूट, रंग गोरा, नाक सरळ, चेहरा उभट आहे. त्यांचे केस पांढरे असून बांधा सडपातळ आहे. त्यांनी अंगात निळ्या रंगाचा हाफ शर्ट, कमरेला राखाडी रंगाची ट्रॅक पॅन्ट, पायात सफेद रंगाची चप्पल घातली आहे. त्यांना जन्मापासून पोलिओ असल्याने उजव्या पायाने दिव्यांग आहेत.

### विवाहितेची आत्महत्या

**पनवेल :** एका विवाहितेने राहत्या घरात अज्ञात कारणावरुन गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना उसर्ली खुर्द गावाच्या हद्दीत घडली आहे. निळकंठ विश्वजीत या सोसायटीमध्ये राहणाऱ्या एका विवाहितेने घरात कोणी नसताना बेडरुममधील छताला असलेल्या पंख्याला गळफास घेवून अज्ञात कारणावरुन आत्महत्या केली आहे. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली असून पुढील तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

# गावठाणाला जागा द्या

## रांजणखार डावली ग्रामस्थांनी केली मागणी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**रांजणखार डावली ग्राम पंचायत हद्दीत असणारे स.न. ४९ व स.न. ५३/१ या मिळकतीमधील क्षेत्र गावठाण विस्तार योजनेअंतर्गत गावठाणाकरिता उपलब्ध करून मिळावे आणि मिळकतीमधे होत असलेले बेकायदेशीर अतिक्रमण व विक्री व्यवहार यांची चौकशी होऊन संबंधितांवर कठोर कारवाई करून दोषींवर गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी अलिबाग तालुक्यातील रांजणखार डावली, ग्रामस्थांनी अलिबाग तहसीलदार यांच्याकडे केली आहे.**

याबाबत अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी अलिबागचे निवडणूक नायब तहसिलदार अजित टोळकर, अलिबाग पंचायत समितीचे माजी सभापती प्रकाश पाटील, माजी सरपंच विलास भागात, माजी उपसरपंच अविनाश पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अजित पाटील, सुजित पाटील, केतन पाटील आदी रांजणखार डावलीचे ग्रामस्थ उपस्थित होते.



रांजणखार डावली हे गाव गेली अनेक वर्षे दुर्लक्षीत अवस्थेमध्ये आहे. या गावाची लोकवस्ती २५०० ते ३००० पर्यंत आहे. सदर गावाचे गावठाण हे खुप कमी क्षेत्राचे आहे. या कारणाने या गावातील घरे ही खुप दाटीवाटीने बांधलेली असून ती एकमेकाला लागुन आहेत. गावामधे अनेक गैरसोई आहेत. पाणी, वीज,रस्त्यांसारख्या मुलभूत सुविधादेखील गावास योग्य प्रकारे प्राप्त नाहीत. भारत स्वतंत्र होऊन ७५ वर्षे झाली तरी गाव मुलभुत सुवीधांपासुन वंचित आहे. शिवाय गावाची लोकवस्ती दिवसेंदिवस वाढत आहे मात्र गावातील अनेक कुटूंबांना जागेअभावी घरे बांधणे गैरसोईचे होत चालले आहे. गावातील लोक बहुतांशी गरीब असल्याने त्यांना घरासाठी जागा विकत घेणे अशक्य आहे. यामुळे लोकांची प्रचंड गैरसोय होत आहे.

रांजणखार डावली येथील स. नं. ४९ या जमीनीचे क्षेत्र मोठे असून सदर क्षेत्राची मिळकत रांजणखार डावली या गावालगत आहे. सदर जागा ही पडीक आहे. तेथे काहीही विकासकामे होत नाहीत. सदर स. नं. ४९ हे क्षेत्र गावठाणाकरीता सहज उपलब्ध होऊ शकते. तसे झाल्याने गावातील अनेक कुटूंबाना घरांपासून वंचित रहावे लागणार नाही, असे ग्रामस्थांनी निवेदनात म्हटले आहे.

रांजणखार डावली स. नं. ४९, क्षेत्र ७४.६९.२८ व स. नं. ५३/१, क्षेत्र २१.९७.४० या सरकारी जागांमधील काही क्षेत्रामध्ये काही मोजक्या लोकांनी जाणुनबुजून अतिक्रमण केलेले आहे या जमिनीवर कच्च्या स्वरूपाचे कंपाऊंड करून ते क्षेत्र धनदांडग्यांना विक्री करत आहेत. या भूमाफियांवर शासनामार्फत दंडात्मक स्वरूपाची कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. एकतर जागा शासकीय असून तेथे अतिक्रमण होत आहे. याप्रकारे अतिक्रमण होऊन जमिनीची विक्री झाल्यास रांजणखार डावली ग्रामस्थांना भविष्यात गावठाणासाठी जागा उपलब्ध होऊ शकणार नाही व गावठाण नसल्याकारणाने अनेकजण घरांपासून वंचित राहून अनेक कुटुंबाना गाव सोडून जाणे भाग पडेल, असे निवेदनात म्हटले आहे.

## हिराकोट तलावाला चढणार नवा साज

**अलिबाग :** जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असलेल्या हिराकोट तलाव पर्यटक, स्थानिकांसाठी आकर्षणाचे केंद्र राहिला आहे; पण तलावाच्या संरक्षण भिंतीची पडझड होत असल्याने संभाव्य अपघात टाळण्यासाठी अलिबाग नगरपालिकेने तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. हिराकोट तलावाच्या संरक्षण भिंतीला ठिकठिकाणी पडलेल्या भगदाडामुळे ऐतिहासिक तलावाचे सौंदर्य लोप पावत होते. कान्होजी आंग्रे यांनी हिराकोट किल्ला बांधताना काढलेल्या दगडातून या तलावाची निर्मिती केली होती. त्यामुळे या तलावाला आगळेवेगळे ऐतिहासिक महत्त्व आहे. मात्र, या तलावाच्या संरक्षण भिंतीला अनेक ठिकाणी भगदाड पडलेले आहेत. त्यामुळे दुरुस्तीसाठी तातडीने निधी उपलब्ध करून डागडुजी सुरू केल्याची माहिती अलिबाग नगरपालिकेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंखे यांनी दिली आहे.

# जाळी सुकविण्यासाठी मच्छीमारांची लगबग

**। रायगड । प्रतिनिधी ।**

बंगालच्याउपसागरातधडकलेले रेमुल वादळामुळे समुद्र खवळला असून मागील आठवड्यात कोकण किनारपट्टीवर वेगवान वाऱ्यासह पडलेल्या वळीवाच्या पावसाने शेवटच्या टप्प्यात मच्छीमारांना अपेक्षित उत्पादन मिळालेले नाही. त्यामुळे हवालदिल झालेल्या मच्छीमारांनी नौका बंदरात ओढण्यास सुरवात केली आहे. मच्छीमारी जाळी सुकविण्यास काढली आहेत.

येत्या आठवड्यात खलाशी म्हणून आलेले नेपाळी, बिहारी, ओरीसी, उत्तरप्रदेशी कामगार परतीच्या प्रवासाला लागणार असल्यामुळे एक आठवडा आधीच पॅकअप करावे लागले आहे. चार दिवसांनी मच्छीमारी हंगाम संपणार असला तरीही ८० टक्के नौका बंदरात स्थिरावल्या आहेत. त्यामुळे अखेरच्या टप्प्यात जहाज-नौकांची डागडुजी करणे, जाळी सुकवून पुढच्या हंगामात वापरात येतील अशी तजवीज करणे यासाठी मच्छीमारांची तयारी सुरू झाली आहे.

नौकांच्या देखभालीसाठी वर्षानुवर्षे वापरण्यात येणारे साहित्य, नौकेवरील जेवणासाठीचा सिलेंडर, नौकांवरील अवजड जाळी सुरक्षित ठेवण्यासाठीचा आटापिटा सुरू झाला आहे. सुमारे ८० टक्के नौका बंदरात दाखल झाल्या आहेत. नौकांवरील जाळी, टेम्पो अथवा ट्रकमधून पर्ससिनेटची जाळी सुकविण्यासाठी मैदानात आणली आहेत. फाटलेली जाळी जागेवरच दुरुस्त केली जात आहे. बंदरांवर उभ्या असलेल्या लाकडी बोटींच्या दुरुस्तीची कामेही सुरू आहेत. उरण, करंजा, बोडणी, रेवस, नवगाव, थळ, वरसोली, अलिबाग, आक्षी, थेरोंडा, आग्राव, कोर्लई, बोर्ली, मझगाव, एकदरा, राजपुरी, दिघी, दिवेआगर, जीवनाबंदर भागात नौकांच्या डगडुजीचे कामही सुरू आहे.

# मासेमारी बंदीचा कालावधी वाढवा!

## मत्स्य दुष्काळ रोखण्यासाठी मच्छीमारांचा पर्याय

**। रायगड । प्रतिनिधी ।**

यंदाच्या मत्स्य हंगामात समुद्रात माशांचे दुर्भिक्ष निर्माण झाले होते. या मत्स्य दुष्काळाचा फटका मच्छीमारांना चांगलाच बसला. त्यासाठी माशांच्या प्रजोत्पादनाच्या कालावधीत मच्छीमारांकडून माशांच्या अत्यंत लहान पिलांची होणारी कत्तल थांबविण्यासाठी मासेमारी बंदीचा कालावधी हा फेब्रुवारी, मार्च आणि दरवर्षीप्रमाणे जून, जुलै असा करण्यात यावा, अशी मागणी मच्छीमार बांधवांकडून पुढे येत आहे.

ऑगस्टपासून मत्स्य हंगाम सुरू होताच पापलेट, दाढा, घोळ, रावस यांची मासेमारी केली जाते, तर सप्टेंबरपासून बोंबील, काटी, मुशी अशा लहान माशांची मासेमारी होते. या वेळी जाळ्यात अडकणारा प्रत्येक मासा हा अंड्याने भरलेला असतो. ही अंडी डिसेंबरपर्यंत पूर्णपणे समुद्रात सोडतो आणि त्यातूनच अत्यंत लहान पिल्ले जन्माला येतात, मात्र या वेळी लहान-मोठ्या आसांच्या जाळ्यांनी सतत मासेमारी सुरू असते. आपट्याच्या पानाच्या आकाराची अत्यंत लहान पापलेटची अगणित पिल्ले सुकत टाकलेली दृष्टीस पडतात. शिवाय पापलेट, दाढा, घोळ, रावस अशा किमती माशांच्या मासेमारीसाठी जी मोठ्या आसाची जाळी वापरली जातात, त्यात गाडीभर लहान बोंबील, सुकट अडकून मरून जातात. ती पुन्हा समुद्रात फेकून दिली जातात.

जून ते ३१ जुलैपर्यंतची पावसाळी मासेमारी बंदी ही केवळ मत्स्य संवर्धनासाठी असते. या कालावधीत कोणत्याही माशांचे प्रजोत्पादन होत नाही. त्यासाठी माशांच्या लहान पिलांची कत्तल थांबवायची असेल तर फेब्रुवारी आणि मार्चदरम्यान मासेमारी बंदी करण्यात यावी. तसेच त्यानंतर नेहमीप्रमाणे १ जून ते ३१ जुलैपर्यंत पावसाळी मासेमारी बंदी करण्यात यावी. त्यामुळे मत्स्य दुष्काळ संपवण्यास मदत होईल. एप्रिल, मेमध्ये मच्छीमारांना मासेमारी करता येईल, अशी मागणीही पुढे येत आहे.

## आर. के. पाटील यांचे निधन

**हमरापूर :** तांबडशेत गावचे निवृत्त माध्यमिक शिक्षक आर. के. पाटील यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांना नवी मुंबईतील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे आणि पाटील परिवार आहे. गेल्या वर्षी ते शिक्षकी पेशातून निवृत्त झाले होते. आ. जयंत पाटील यांचे ते खास कार्यकर्ते होते.





# केनियातील रेल्वेच्या देखभाल-दुरुस्तीची मदार कोकण रेल्वेवर

**। रायगड । प्रतिनिधी ।**

कोकण रेल्वे प्रशासनाकडून देशभरातील विविध भागात रेल्वे, बोगदे तसेच देखभाल-दुरूस्तीची कामे करण्यात येतात. कोकण रेल्वेने आता थेट केनियन रेल्वेची देखभाल-दुरूस्तीची कामे हाती घेतली आहेत. कोकण रेल्वेचा आफ्रिका खंडातील आंतरराष्ट्रीय पातळीवरील पहिलाच प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे कोकण रेल्वेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

कोकण रेल्वेला जागतिक पातळीवर मानाचे स्थान मिळावे यासाठी कोकण रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी अथक प्रयत्न करीत आहेत. यातूनच कोकण रेल्वेने भारत-नेपाळ रेल्वे मार्ग तयार करण्यासाठी पुढाकार घेतला. आता केनियातील रेल्वेचे व्यवस्थापन आणि देखरेख करण्यासाठी कोकण रेल्वेने तयारी दर्शवली व त्याला केनियन सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला. केनियातील मगडी येथे टाटा केमिकल्स कंपनी असून, या कंपनीच्या महत्त्वाच्या कामासाठी तेथे मालवाहतूक करण्यात येते. या मालवाहतुकीच्या देखभालीसाठी कोकण रेल्वेशी करार करण्यात आला आहे. यासह ट्रॅक, लोकोमोटिव्ह आणि रोलिंग स्टॉकसह रेल्वे प्रणालींचे पनर्वसन करण्यात आले आहे. आफ्रिका खंडातील हा पहिला आंतरराष्ट्रीय प्रकल्प असल्याचे कोकण रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

भारत-नेपाळमधील दळणवळण यंत्रणा सक्षम करतानाच व्यापार आणि वाणिज्य संपर्क वाढवण्यासाठी रेल्वे मार्ग तयार केला जात होता. चेन्नईतील इंटिग्रल कोच फॅक्टरीमध्ये ‘डेमू’ रेक तयार करण्यात आला. त्यानंतर, बिहारमधील जयनगर आणि नेपाळमधील कुर्था या मार्गावर प्रवासी रेल्वे सेवा सुरू केली. तसेच, कोकण रेल्वेने दोन डेमू रेल्वेचे रेक नेपाळला प्रदान केले. याशिवाय, कोकण रेल्वेच्या मार्गदर्शनाखाली नेपाळ रेल्वे कंपनी काम करत असून प्रवासी सेवांचे संचालन आणि देखभालही कोकण रेल्वे पाहत आहे नवी मुंबई येथील मेट्रो रेल्वेच्या व्यवस्थापन व देखरेखीचेही कंत्राट कोकण रेल्वेला मिळाले आहे.

### कोकण रेल्वेची देशभरातील कामे

**जम्मू-काश्मीरमध्ये उधमपूर श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे मार्गिकेचे बांधकाम, रत्नागिरीमधील लोटो येथे रोलिंग स्टॉक फॅक्टरीचे बांधकाम, केरळमधील विझिंजम आंतरराष्ट्रीय समुद्री पोर्ट रेल्वे कनेक्टिव्हिटी, केरळमधील अनक्कमपोयल कल्लाडी मेप्पडी रोड बोगदा प्रकल्प, ईस्ट कोस्ट रेल्वेवरील खुर्दा रोड बोलांगीर नवीन बीजी रेल्वे लिंक प्रकल्पासाठी व्हायाडक्ट उड्डाणपुल बांधकाम.**

# सावरकरांना अभिवादन

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहरातील स्वातंत्र्यवीर सावरकर चौक येथे आज सावरकर प्रेमींनी उपस्थित राहून त्यांना अभिवादन केले.

स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर यांच्या पुतळ्याला आज सकाळी अनिल भगत, अमित ओझे, रुचिता लोंढे, माधुरी गोसावी, संजय कदम, महेंद्र गोडबोले , तेजस वाडकर, सुशांत पाटणकर, विनिता जोशी, सुनिल भगत, योगेश रानडे, दीपक झेले, अभिषेक पटवर्धन, मनोहर लिमये, संजय गडगे आदींनी पुष्पहार अर्पण केला.

## ॲक्टीव्हा मोटार सायकलची चोरी

**पनवेल :** पनवेल रेल्वे स्टेशन जवळील परिसरात उभी करून ठेवलेली ॲक्टीव्हा मोटार सायकल अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेली आहे. अविनाश यादव यांनी पनवेल रेल्वे स्टेशन जवळील बस स्टॅण्ड येथील सिडको पार्कींगच्या पलीकडील रोडवर उभी करून ठेवलेली ॲक्टीव्हा मोटार सायकल क्र.एमएच-४६-बीटी-३४७६ ही अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# उरणमध्ये ७० टक्के नालेसफाई पूर्ण

**। उरण । वार्ताहर ।**

उरण शहरातील मान्सूनपूर्व नालेसफाईची कामे सुरू असून, आतापर्यंत सत्तर टक्के कामे पूर्ण झाली असल्याचे नगरपालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. मात्र, शहरातील पाणी निचऱ्याची समस्या कायम आहे. गतवर्षी नालेसफाईनंतर शहरातील मुख्य रस्ते पावसाच्या पाण्याने ओसंडून वाहत होते. त्यामुळे नगरपालिकेसमोर यावर्षी हे मोठे आव्हान असणार आहे.

> जवळपास ७० टक्के नालेसफाई पूर्ण झाली आहे. मुख्य रस्त्यांवरील पाणी तुंबणारा भाग आमच्या हद्दीत येत नाही. तेथील उपाययोजनांबाबत सिडकोकडे पत्रव्यवहर केला आहे.
> - समीर जाधव, मुख्याधिकारी, उरण नगर पालिका.

शहर परिसर अवघ्या तीन किमी अंतराच्या परिघाचा आहे. तरीही दरवर्षीच्या पावसात शहरातील गणपती चौक, स्वामी विवेकानंद चौक, पालवी हॉस्पिटल परिसर, कुंभारवाडा, ग्रामीण रुग्णालय मार्ग आदी ठिकाणी पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचते. शहरातील ही ठिकाणे तासभर पाणी पडले तरी तुडुंब भरतात. यासाठी नालेसफाईबरोबर पाणी निचरा होण्याची कायमची उपाययोजना करावी, अशी मागणी उरणकर करत आहेत.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- बोअरवेल-विहिरीसाठी मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९
- अलिबाग मधील ऑफिसकरीता एक्सपेरिएंस्ड ड्राफ्ट्समन, आर्किटेक्ट, इंटीरियर डिझायनर पाहिजे. मोबाईल नंबर ९९७०३९१६९७
- सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय२५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६
- बजाज शोरूम अलिबागमध्ये कामासाठी (टू व्हिलर) मेकॅनिक पाहिजे संपर्क : प्रबोध राऊत ९७०२४५९१५१ बजाज शोरूम बायपास रोड अलिबाग
- अकाउंटट पाहिजे B.com ,Tally ठिकाण- बामणसुरे, चोंढी पगार- ८००० महिना संपर्क : ९८२३५८५३२१
- अलिबाग फार्म मध्ये येऊन फार्म हाऊससाठी दिवसभर स्त्री अथवा पुरूष कामगार पाहिजे. संपर्क : ९४२३८९०२९५
- अलिबागमधील दुकानात कामासाठी मुलगा अथवा मुलगी हवी आहे. संपर्क : ८४२१३५४६४०
- जय गजानन सोसायटी चेंढरे-अलिबाग 1BHK फ्लॅट नं. २०२ भाड्याने देणे आहे. मो.नं. ८०८००५८३७५
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १. रिसेप्शन, २. लोकल जेवण बनवण्यासाठी हॉटेल लेडीज स्टाफची आवश्यकता आहे. शिफ्ट टाइमिंग दुपारी २ ते रात्री ११, २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा. (व्हॉटसॲप वर मेसेज करावा.) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५
- Shop near alibag ST Stand is for sale 9764548679
- Autocad draftsman required in architectural firm. Location :Alibag Comtact no:9970391697

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# माथेरानला सक्षम नेतृत्वाची गरज

**। माथेरान । वार्ताहर ।**

कदाचित समाजकारणाची, सामाजिक बांधिलकी, जनहिताची आणि जनसेवेची बिरुदावली राजकारणात आर्थिक मलिदा मिळविण्यासाठी डुंबलेल्या आणि श्रेयवादाच्या चक्रव्यूहात अडकलेल्या काही राजकीय पक्षांच्या मंडळींना जे स्वतःला नेते असल्याचा आभास आणून मिरविण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यांची स्तुती करून पक्षातच अंतर्गत मतभेद निर्माण करून स्वतःची पोळी भाजून घेण्यासाठी आटापिटा करीत आहेत.



अशा धूर्त लोकांमुळे राजकारणाचे समीकरण बदललेले असून प्रामुख्याने मूठभर मतांसाठी संपूर्ण गावाला विकासापासून रोखण्यासाठी पुरेपूर प्रयत्न करणाऱ्या नतद्रष्ट राजकीय लोकांमुळे गावाची उन्नती आजमितीपर्यंत होऊ शकलेली नाही. ज्यांचे राजकीय अस्तित्व पूर्णपणे संपुष्टात आले होते. अशा महाभागांना संजीवनी देऊन पुन्हा राजकीय पटलावर आणण्यासाठी पुढाकार घेतल्यामुळेच आजवरच्या कार्यकाळात प्रत्येक विकासात्मक कामात खोडा घालण्या पलीकडे काहीच साध्य झालेले नाही. तीन ते चार पिढ्यांपासून इथला भूमिपुत्र संघर्षाची ठिणगी सोसत आहे. परंतु या भूमिपुत्रांना गृहीत धरून परिसरातुन व्यवसायासाठी आलेल्या अन इथे ठाण मांडून बसलेल्या असंख्य लोकांचे लांगुलचालन करण्यात राजकीय मंडळी धन्यता मानत आहेत.

माथेरान हे पर्यटनक्षेत्र म्हणून फक्त नावाला प्रसिद्ध आहे. परंतु इथे येणाऱ्या पर्यटकांचा प्रवास सुखकर होत आहे किंवा नाही त्यांना सुविधा उपलब्ध होत आहेत का, त्यांची दिशाभूल होऊन इथे आल्याचा पश्चाताप तर होत नाही ना,त्यांची गाऱ्हाणी ऐकण्यासाठी संबंधित अधिकारी वर्ग जागृत आहे की नाही, पर्यटकांची संख्या वाढून स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत की नाही, सर्व शासकीय अधिकारी वर्ग केवळ पगारापुरता कामे करत आहेत का त्यांची सुध्दा या गावाच्या बाबतीत काही नैतिक जबाबदारी आहे की नाही याबाबत आजवर कोणत्याही राजकीय पक्षांच्या लोकांनी पुढाकार घेऊन या स्थळाला विकसनशील क्षेत्र बनविण्यासाठी ठोस पाऊले उचललेली नाहीत. दर पाच वर्षांनी सर्वच राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यात तेच तेच मुद्दे अधोरेखित करून निव्वळ सर्वसामान्य लोकांना आशेवर ठेऊन स्वताच्या उन्नती साठी धडपड करणारे महाभाग दिसत असल्याने सत्तेसाठी काय पण अशीच वृत्ती यांच्या नसानसात ठासून भरलेली आहे.

एकविसाव्या शतकाकडे वाटचाल होत असताना इथे येणाऱ्या पर्यटकांना ज्यांच्या जिवावर इथलं सगळं अर्थकारण अवलंबून आहे त्यांना साध्या सोयीसुविधा मिळू शकत नाहीत. मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या दस्तुरी नाक्यावर ज्याप्रकारे पर्यटकांना त्रासाला सामोरे जावे लागते त्याबाबत कुणालाही स्वारस्य दिसत नाही. नेरळ माथेरान ह्या एकमेव मार्गामुळे स्थानिकांसह पर्यटकांची कुचंबणा होत असते. आलेल्या पर्यटकांचा निदान प्रवास सुरळीत झाला तरच इथे सर्वांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. त्यासाठी पोलीस प्रशासनाने ही बाब गांभीर्याने घेणं गरजेचं आहे. जागोजागी जुनी दोनशे ते तीनशे वर्षांपूर्वीची झाडे सुकून जात आहेत त्या झाडांना काटेरी कुंपण सुध्दा वनखात्याच्या आणि वनसमितीच्या माध्यमातून केले जात नाही.याठिकाणी जर हवेतील गारवा शिल्लक राहिला नाही तर इकडे कुणीही फिरकणार नाही.दस्तुरी नाक्यावर उतरल्यावर पर्यटकांना आवश्यक माहिती मिळण्यासाठी माहितीकेंद्र नाहीत त्यामुळे त्यांची दिशाभूल करून खिसा रिकामा करण्यात काही व्यवसायिक तज्ञ झाले आहेत.

नगरपालिका प्रशासन, वनखाते, पोलीस प्रशासन आणि स्वतःला नेते म्हणवणाऱ्या राजकीय पक्षांच्या मंडळींनी एकोप्याने सुवर्णमध्य काढला नाही तर ह्या सुंदर गावाला धोक्याची घंटा आहे. परिसरातील लोंढे वाढत चालले असून त्यांनी इथे आपले ठाण मांडले आहे त्यांना या गावाविषयी काही सहानुभूती नाही. त्यातच विकासाला चालना देण्याऐवजी नेहमीच विरोध करणाऱ्या धूर्त लोकांना वेळीच रोखले नाही तर ह्या गावाचा विकास भविष्यात होणे अवघड आहे त्यासाठी अशा लोकांना राजकीय मंडळींनी केवळ मतांसाठी गोंजारणे टाळले नाही तर स्थानिकांना आपला मुक्काम हलवावा लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# कोकण पदवीधर निवडणुकीसाठी रस्सीखेच

**। रायगड । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीचा धुरळा शांत होत असतानाच आता कोकण पदवीधर मतदारसंघाची निवडणूक लागली आहे. भाजपचे विद्यमान आमदार निरंजन डावखरे यांना तिसऱ्यांदा संधी मिळेल, असे चित्र होते; पण आता मतदारसंघासाठी खलबते सुरू झाली आहेत. भाजपपाठोपाठ शिवसेना शिंदे गटही उमेदवारीसाठी आग्रह असल्याचे समजते. त्यामुळे महायुतीत मिठाचा खडा पडण्याची शक्यता आहे. शिवसेना ठाकरे गटाने अजून आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही. दरम्यान, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आपला उमेदवार जाहीर केल्याने महायुतीच्या गोटात खळबळ उडाली आहे. एकंदरीत लोकसभा निवडणुकीत एकत्र एका मंचावर दिसणारे पक्ष कोकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत परस्परांविरोधात उभे ठाकण्याची शक्यता आहे.

लोकसभा निवडणुकीनंतर राज्यात होणाऱ्या मुंबई, कोकण पदवीधर आणि नाशिक, मुंबई शिक्षक मतदारसंघ या चार विधान परिषदेच्या निवडणुकांचे वेध लागले आहेत. २६ जूनला ही निवडणूक होणार असल्याने सर्वच पक्षांनी आपली मोर्चेबांधणी सुरू केली आहे. २०१८ मध्ये झालेल्या कोकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत राष्ट्रवादीतून भाजपमध्ये आलेल्या निरंजन डावखरे दुसऱ्यांदा निवडून आले होते. त्यावेळी एकसंघ असलेल्या शिवसेनेकडून माजी महापौर संजय मोरे यांना संधी देण्यात आली होती. तर राष्ट्रवादी सोडल्यामुळे निरंजन डावखरे यांच्याविरोधात राष्ट्रवादीचे नजीब मुल्लाही मैदानात उतरले होते. त्यावेळी निरंजन डावखरे यांना ३२ हजार ८३१ मते मिळाली तर संजय मोरे यांना २४ हजार ७०४ मते मिळाली. अवघ्या पाच ते सहा हजार मतांच्या फरकाने निरंजन डावखरे दुसऱ्यांदा निवडून आले. त्यावेळी शिवसेना- भाजप युती होती. तरीही दोन्ही पक्षांनी स्वतंत्र उमेदवार देत निवडणूक लढवली होती. यावेळीही याची पुनरावृत्ती होण्याची शक्यता आहे.

महायुतीतच कोकण पदवीधरच्या जागेवरून रस्सीखेच होण्याची शक्यता आहे. महायुती म्हणून शिवसेना शिंदे गट व भाजपने एकत्रित ही निवडणूक लढवली तर यात भाजपच्या निरंजन डावखरे यांचा पत्ता कट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे लोकसभेप्रमाणे शिवसेना शिंदे गट आपला हट्ट पूर्ण करणार की भाजप दावा सोडणार, याकडेही लक्ष लागले आहे. दरम्यान, भाजपच्या निरंजन डावखरे यांनी विधान परिषदेची पायरी तिसऱ्यांदा चढण्यासाठी जोरदार तयारी केली आहे. मतदारसंघ त्यांनी बांधला आहे. या पार्श्वभूमीवर त्यांना भाजपकडून उमेदवारी नाकारण्याची शक्यताही कमी असल्याचे म्हटले जात आहे; पण यात लोकसभा निवडणुकीत महायुतीला बाहेरून पाठिंबा देणाऱ्या मनसेने अभिजित पानसे यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे कोणाचा पत्ता कट होणार की डाव रंगणार हे लवकरच कळेल.

कोकण शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाने भाजपला महायुती म्हणून सहकार्य केले होते. भाजपकडे उमेदवार नसतानाही मुख्यमंत्र्यांनी ज्ञानेश्वर म्हात्रे यांना कमळच्या चिन्हांवर शिलेदार पाठवला. आता त्या मोबदल्यात कोकण पदवीधर मतदारसंघ घेण्याच्या तयारीत शिवसेना शिंदे गट असल्याचे समजते. दुसरीकडे महायुतीला लोकसभेत बिनशर्त पाठिंबा मनसेने दिला होता.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल १) श्रीमती. मीनाक्षी राजेश घरत, २)श्री.प्रदिप अंबाजी घरत दोघेही रा. जासई, ता. उरण, जि. रायगड - ४१०२०६. यांनी कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे-खांडस, ता. कर्जत, जि.रायगड येथिल मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,**

| जमीन मालक | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रू. पै |
|---|---|---|---|---|
| अजित विठ्ठल सोनावणे | ८२ | १३ | ०.३१.०० | ०.२८ |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युप्रत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वास कळावे.

तारीख :- २९/०५/२०२४

**ॲड.कल्याणी रवी गायकर**
पत्ता - प्रेमसिंधु अपार्टमेंट,
कोतवालनगर - कर्जत, जि. रायगड
मो.नं. ८४४६१४८७८१

## E –TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000031187**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-23/2024-2025.**<br>RFx e-tender for Supply of Silica Gel, Cotton Cloth, Petroleum Jelly and Polythene Paper at various substation under EHV O&M Division Panvel...**2nd call.**<br>**Tender amount Rs. 4,97,456/-,**<br>**EMD amount Rs. 5,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **28.05.2024, 17:00 Hrs. to 04.06.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 04.06.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **05.06.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

## ग्रामपंचायत चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड

### जाहीर नोटीस

दि.२८/०५/२०२४
जा.क्र.    /२०२४

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतराणासंबंधाने ग्रामपंचायत चेंढरेस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत चेंढरे कडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसूलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

| अ. नं. | प्रभाग क्रमांक | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ५ | १५२९/४ | श्री समर्थ गृह संस्था मर्या. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला ४०७ चौ.फूट | सौ.प्रज्ञा मोहन बनकर | सिद्धार्थ श्रीकांत पाटील श्वेता सिद्धार्थ पाटील |
| २ | ४ | १८२५/७ | सि शेल डि विंग | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ५६३ चौ.फुट | श्री.मंगेश गोपाळ गायकवाड सौ.मिनाक्षी मंगेश गायकवाड | सुरज शांताराम झावरे, रूचिता सुरज झावरे |
| ३ | २ | १९०८/२ | माऊली रेसिडेन्सी विद्यानगर | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ९०० चौ.फुट | श्री.रमेश रामभाऊ श्रावंदे रश्मी रमेश श्रावंदे | गणेश पोपटराव गिते, प्रियंका गणेश गिते |
| ४ | २ | १६८४/६ | पटीयाला हाऊस सोसा. शिवाजीनगर | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ६०० चौ.फुट | अमिता इद्रकांत पाटील, इद्रकांत भगवान पाटील | रमेश मगन सोळंकी, जसू रमेश सोळंकी |
| ५ | २ | | अलिबाग हॉरीझोन | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ६०० चौ.फुट | मे.ए कॉर्प तर्फे पार्टनर वरूण मयुर अजमेरा | मंदार मनोहर म्हात्रे, श्वेता मंदार म्हात्रे |
| ६ | ५ | ८९९/९ | तुलसी को.ऑप. हौ.सोसा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ५९७ चौ.फुट | श्रीरंग रामचंद्र म्हात्रे | श्री.प्रज्वलित श्रीरंग म्हात्रे |
| ७ | २ | १७७१/७ | शिवसिमरन हो.ऑप.हौ.सोसा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ५७१ चौ.फुट | संकेत प्रविण अहिरे | आदिती अजित चिपळूणकर |
| ८ | ४ | १५२४/४ | ज्वेल्स ऑफ अलिबाग एल विंग | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ६४५ चौ.फूट | मेघश्याम गोपीनाथ घरत वगैरे | श्री.चेतन मेघश्याम घरत, सौ.अर्चना भूषण मार्केटकर |
| ९ | ४ | १६८२/२१ | सिगल को.ऑप होसिंग सोसा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ४५८ चौ.फुट | सुनिल एम.मेढेकर | पंकज पुरूषोत्तम सुळे, |
| १० | ४ | १६८२/२२ | सिगल को.ऑप. होसिंग सोसा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ४५८ चौ.फुट ४३४.२९ चौ.फुट | सुनिल एम.मेढेकर | पंकज पुरूषोत्तम सुळे, रोहित सुभाष मेढेकर, अमित सुभाष मेढेकर |
| ११ | ४ | १६८१/२२ | सिगल रेसिडेन्सी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ मजला ३३३.७५ चौ.फुट | भालचंद्र गणपत पाटील | कल्पना भालचंद्र पाटील, हर्षल भालचंद्र पाटील, चैतन्य भालचंद्र पाटील |
| १२ | ५ | १२९१/१ | अनुप्रभा सोसा.ए विंग | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळ मजला ६०० चौ.फुट | उमेशचंद्र नारायणराव देशमुख | उमा चंद्रनिल वाघ |
| १३ | २ | ८६४/७ | प्रथमेश बिल्डींग विद्यानगर | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ५०८ चौ.फूट | श्री.चंद्रकांत अनंत ठाकूर | मिथून नारायण सरलेकर |
| १४ | ६ | ७२८/३ | बाफनाबाग सोसा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ११०० चौ.फुट | शैलेजा पटवर्धन | संजय वसंत बर्वे |
| १५ | ४ | ५०८/२ | कुसुम सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३०० चौ.फुट | अनिल एकनाथ ठाकूर, अमिता अनिल ठाकूर | सागर अनिल ठाकूर |
| १६ | ६ | ७५६/७ | ओमकार सोसा. | आर.सी.सी.बांधकाम पहिला मजला ६६१चौ. | नंदा मधुसुदन गोसावी | अजित मधुसुदन कुंटे |
| १७ | ३ | ३०३ | पतंनगर चेंढरे | पक्के सिमेंट बांधकाम घर | सुनंदा श्याम मानकर | दिलीप श्याम मानकर सुनिल श्याम मानकर ममता अजित मानकर |

सही/-
**श्री.निलेश लक्ष्मण गावंड**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत चेंढरे**
**ता.अलिबाग जि.रायगड**

सही/-
**सौ.स्वाती सतिश पाटील**
**सरपंच**
**ग्रामपंचायत चेंढरे**
**ता.अलिबाग जि.रायगड**

## खुलासा

दैनिक कृषीवलच्या कलासक्त या पुरवणीमध्ये पान नं. ८ वर दि. ११ मे रोजी प्रसिद्ध झालेला ''नाच गं घुमा! मोलकरणीचंच नाही माणुसकीचं 'मोल' सांगणारा चित्रपट'' हा लेख चुकीने प्रसिद्ध झाला. ही बाब हेतुपूरस्कर करण्यात आली नसून याबाबत कोणताही फायदा कंपनीने केला नाही. कॉपीराईटचे उल्लंघन केल्याबाबत लेखक तसेच प्रकाशकांकडे दिलगिरी व्यक्त करण्यात येत आहे. तसेच आपल्या मागणीनूसार हा लेख कृषीवलच्या डिजिटल आवृत्तीमधून काढण्यात आला आहे. झालेल्या प्रकाराबद्दल क्षमस्व. यापुढे असे होणार नाही, याची खात्री देत आहोत.

**- कार्यकारी संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल १) श्रीमती. मीनाक्षी राजेश घरत, २) श्री. प्रदिप अंबाजी घरत दोघेही रा. जासई, ता. उरण, जि. रायगड - ४१०२०६. यांनी कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे-खांडस, ता. कर्जत, जि. रायगड येथिल मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र हे आर-पॉ | आकार |
|---|---|---|---|
| ८२ | १४ | ०.३१.०० पैकी १)श्री. सुरेश परशु ऐनकर २)श्री. पुंडलिक परशु ऐनकर ३) श्री. शिवाजी परशु ऐनकर यांचे अविभक्त मालकीचे रस्त्याच्या वहिवाटीकरिता दिलेले क्षेत्र ११५ फुट लांबी X१० फुट रूंदी =११५० चौ.फुट लांबी X रूंदी | ०.२८ |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युप्रत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/ हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वास कळावे.

तारीख :- २९/०५/२०२४

**ॲड.कल्याणी रवी गायकर**
पत्ता- प्रेमसिंधु अपार्टमेंट,
कोतवालनगर-कर्जत, जि. रायगड
मो.नं. ८४४६१४८७८१

दिनांक : २९ मे २०२४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिध्द झाल्या पासून ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे पाचखडकवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकांची नावे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| हरेश विश्वनाथ घुडे | ११ | ० | ०-१४-० | ० | १२ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता: मु.पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक :-२९/०५/२०२४
मो.नं. ९१५८२७७७२८

## जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्ही खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत जमीन विवरण सर्व्हे क्र. ७३०/१, मोजमापित ०-३२-०० एचए अर्थात ३२०० चौ.मी., गाव ढोकावडे, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड (यापुढे सदर **मालमत्ता म्हणून उल्लेखित**) श्री. तरुण नंदकुमार सकसेरिया यांचे हक्क, अधिकार व हितसंबंधांची चौकशी करीत आहेत.

कोणीही घटक/व्यक्ती यांमध्ये कोणतीही बँक वा वित्तीय संस्था यांचा समावेश असेल यांचा सदर मालमत्ता वा तिच्याकोणत्याही भागासंदर्भात विक्री, विनिमय, भाडेकरार, उपभाडेकरार, अभिहस्तांकन, गहाण, प्रभार, धारणाधिकार, उत्तराधिकार, मृत्यूपश्चात वारसा, वारसा, भेट, देखभाल, सुविधाधिकार, न्यास, वहिवाट, उप-वहिवाट, अनुज्ञप्ती, ताबा, कब्जा, कुटुंब व्यवस्था/तडजोड, कोणत्याही विधि न्यायालयाचा निवाडा वा आदेश, कंत्राटे/करार, विकास हक्क, भागीदारी, कोणतीही लिखापढी व/वा व्यवस्था वा अन्यकोणत्याही स्वरूपात कोणताही हक्क, अधिकार, लाभ, हितसंबंध, दावा वा मागणी असल्यास त्यांनीत्यासंदर्भात लिखित स्वरूपात सहाय्यक कागदोपत्री पुराव्यांसहित अधोहस्ताक्षरितांना लिखितस्वरूपात सदर तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्याआत सूचित करावे तसेच ईमेलद्वारेही कळवावे अन्यथा असा हक्क, अधिकार, लाभ, हितसंबंध दावा व वा मागणी काही असल्यास ते अधित्यागित व वा परित्यागित समजण्यात येतील व माझे अशील व्यवहार करण्याची प्रक्रिया करतील.

**अनुसूची (सदर मालमत्ता)**

पुढील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - सर्व्हेक्र. ७३०/१, मोजमापित ०-३२-०० एचए अर्थात ३२००चौ. मी., गाव ढोकावडे, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड येथील व सीमा पुढीलप्रमाणे :
उत्तरेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र.. ६८५
दक्षिणेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. ७२९
पूर्वेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. ७३०/२
पश्चिमेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. ७२४

**दिनांक : २९.०५.२०२४**
**मे. जानी ॲन्ड पारीख**
**नीरव जानी, भागीदार**
वकील व सॉलिसिटर्स
३११, दलामल टॉवर्स, २११, फ्री प्रेस जर्नल रोड, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१.
ईमेल : nirav.jani@jplaw.in

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यांत येते की, मौजे दांडे तर्फे नांदगांव, ता. मुरुड, जि. रायगड, येथिल पुढील वर्णनाची मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक यांचे कडून आमचे अशिलांनी खरेदी घेणेचे ठरवीले आहे...

**मिळकतीचे वर्णन:**

| मालकाचे नाव | गट नंबर | क्षेत्र हे.आर | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| शेरी भाटीया | ६१/१ | ०-७५-०० | ०-४५ |
| स्मीता शेरी भाटीया | ६१/२ | ०-७५-०० | ०-४५ |
| कांता के भाटीया | ६१/३ | ०-७८-०० | ०-४६ |
| आनंद के भाटीया | ६१/४ | ०-८२-०० | ०-४८ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये इतर कोणाचाही गहाण, दान, लीन, लीज, फरोक्त, साठेकरार, कुळ, भागीदारी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध ताबा वहीवाट असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत लेखी स्वरुपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांचे आत नोंदवावी. कोणाचीही मुदतीमध्ये हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजुन मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व मागावुन येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत. कागदोपत्री पुरावा न जोडलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

दिनांक २८/०५/२०२४

**ॲड. संजय गणेश जोशी**
दरबार रोड, मुरुड ता. मुरुड जंजिरा रायगड.
९४२३३७७३१६/७७९८९९८३९९

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग*
*दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री.परेश रघुनाथ मोफल, श्री.पंकज रघुनाथ मोकल आणि सौ.लिना दामोदर पाटील यांचेकडून खरेदी घेण्याचा करार केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे किहीम, ता. अलिबाग, जि. रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकारणी |
|---|---|---|
| २८० | ०-६७-५० पैकी उत्तर बाजूकडील ०-२२-० | ६-६४ |

जर नमूद मिळकतींवरील विद्यमान मालकांचा मालकीहक्क, ताबा वहिवाट निर्वेध स्वरूपाचा आहे, असे त्यांचे प्रतिपादन आहे. विद्यमान मालकांच्या मालकीहक्काबाबत आणि मिळकतीबाबत कोणाचाही काही हक्क, हितसंबंध असल्यास त्याबाबतच्या हरकती जाहीर नोटीस प्रसिध्द करून मालकीहक्काची खात्री पटवून घेऊन मालकीहक्क निर्वेध असल्याचा दाखला द्यावा अशी विनंती आमचे अशिलांनी खाली सही करणार यांचेकडे केली आहे.

त्याप्रमाणे वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, बान, जक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, दावा, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकतीसंदर्भात कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध नाही असे समजून मालकीहक्क दर्शविणारे दस्तऐवज आणि महसूली कागदपत्रांवरून विद्यमान मालकांचा मालकीहक्क निर्वेध आहे अशा प्रकारचा मालकीहक्क निर्वेध असल्याचा दाखला खाली सही करणार देतील व आमचे अशिल सदर मिळकती खरेदी घेण्याचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दि. २९/०५/२०२४

**ॲड. आर. व्ही. ओक**
गुरूकृपा, महर्षी कर्वेरोड, अलिबाग
अर्बन बँकेजवळ,अलिबाग- रायगड

## जाहीर नोटीस (जाहीरात)

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची बिनशेतीजमिन मिळकत त्याचे मालक झोएब झेड मर्चंड यांचे कडून कायमची विकत घेण्याचे ठरले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : सुगवे, तालुका : कर्जत, जिल्हा : रायगड**

| सं.नं./हि.नं. | क्षेत्रफळ आर चौ. मी | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ३८/१/अ/४३ | १०.४४.०० | १०४.४० |

वर नमूद केलेल्या मिळकतीच्या संबंधात कोणास काही कायदेशिर हक्क, अधिकार व हितसंबंध, गहाण, दान, फरोक्त, वहिवाट, दावा, करार, बोजा, वहिवाट, वारसा, मृत्युपत्र, बक्षीसपत्र, विसारा, पावती, साठेखत, जनरल मुखत्यारपत्र, बँकेचे अगर कोणत्याही प्रकारची हरकती व कोणत्याही प्रकारचा बोजा असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपले वकिला/प्रतिनिधी मार्फत ही जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेल्या दिवसापासून १५ दिवसांचे मुदतीत आपल्या हरकती लेखी व कागदपत्रांसोखत कळवाव्यात, जर नमूद केलेल्या मुदतीत कोणीही हरकती न कळविल्यास कोणाचीही काही एक हरकत नाही असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार करतील याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे नोटीस आहे.
दि. २८/०५/२०२४

**ॲड. ज्ञानेश्वर हरिश्चंद्र राणे**
२०२, तैयब अर्पा, दुसरा मजला, बाजार रोड, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो. ९४२२०७१११२

वरील जाहीर नोटीस ॲड. डी. एच. राणे यांनी वृत्तपत्रा मध्ये प्रसिध्द करण्यास माझी हरकत नाही.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. विलास गणेश भागवत, रा. कर्जत, पाटील आळी, हनुमान मंदिर जवळ, शिवाजी चौक, ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड, येथील बिनशेती जमिन मिळकत**

| स.नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ७/५ | १३.००.०० | १३०.०० | तुलसी प्रकाश डिचोलकर व केविन आईवन डिसोझा. |

वरील वर्णनाच्या बिनशेती जमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन होणाऱ्या ११ (अकरा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- २७/०५/२०२४.

सही /-
**ॲड. उषा जे.कांबळे.**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे .
मो.नं.७३८५००४८०६.

**निवडक**

## रोमँटिक झाले नितीश-सांची

**चेन्नई** : फायनल जिंकल्यानंतर कोलकाताचा खेळाडू नितीश राणा आणि त्याची पत्नी सांची मारवाह मैदानात दिसले. यावेळी दोघांनीही खूप रोमँटिक पोजमध्ये फोटो काढला, जो सांचीने तिच्या इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. नितीश राणाच्या खांद्यावर केकेआरचा झेंडा आहे आणि सांचीने त्याला मिठी मारत हा फोटो काढला आहे. इतकेच नव्हे तर तिने संघातील खेळाडूंसोबत फोटो, व्हीडिओही शेअर केले आहेत.

## खेळाडू अमेरीकेला रवाना

**नवी दिल्ली** : सोमवारी भारताचे आणखी तीन खेळाडू अमेरिकेला रवाना झाले आहेत. या खेळाडूंमध्ये युजवेंद्र चहल, यशस्वी जैस्वाल आणि आवेश खान यांचा समावेश आहे. आयपीएल प्लेऑफमुळे हे खेळाडू भारतीय संघाच्या पहिल्या बॅचसोबत गेले नव्हते. आतापर्यंत अमेरिकेत पोहोचलेल्या खेळाडूंमध्ये रोहित शर्मा तसेच ऋषभ पंत, शुभमन गिल, शिवम दुबे, अक्षर पटेल, जसप्रीत बुमराह, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज, रवींद्र जडेजा, अर्शदीप सिंग आणि सूर्यकुमार यादव या खेळाडूंचा समावेश आहे.

## सपोर्ट स्टाफला खेळवणार?

**मेलबर्न** : आयपीएलची सांगता आणि टी-२० विश्वकरंडक स्पर्धेची सुरुवात यामध्ये फारच कमी कालावधी असल्याचा फटका ऑस्ट्रेलियाला बसत आहे. अगामी विश्वकरंडक स्पर्धा वेस्ट इंडीज-अमेरिकेत येत्या १ तारखेपासून (शनिवार) सुरू होत असून आता लगेचच सराव सामने होत आहेत आणि त्यात खेळण्यासाठी ऑस्ट्रेलियाकडे पुरेसे खेळाडू नाहीत. त्यामुळे सपोर्ट स्टाफमधील सदस्यांना क्षेत्ररक्षणासाठी उतरवावे लागणार असल्याची परिस्थीती निर्माण झाली आहे.

## स्टार्कचे निवृत्तीचे संकेत

**चेन्नई** : देशासाठी खेळण्याकरिता सर्वाधिक प्राधान्य देत असलेल्या मिचेल स्टार्कने आता कोणत्या तरी एका प्रकारातून निवृत्ती घेण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे फ्रँचाईजी लीग क्रिकेट खेळण्याचे दरवाजे त्याच्यासाठी उघडू शकतील. स्टार्क प्रदीर्घ कालावधीनंतर आयपीएलमध्ये खेळला आहे. टी-२० विश्वकरंडक स्पर्धा असल्यामुळे सरावासाठी त्याने यंदा आयपीएलमध्ये खेळण्यास प्राधान्य दिले असून कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० यापैकी कोणत्या प्रकारातून निवृत्ती घेणार असल्याचे त्याने उघड केलेले नाही.

## सिन्नरचा सहज विजय

**पॅरिस** : जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर असलेला इटलीचा जान्निक सिन्नर दुखापतीतून पूर्णपणे सावरलेला दिसून येत आहे. फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेत त्याने आपल्या पहिल्या फेरीत अमेरिकेच्या ख्रिस्तोपर युबँक्स याचा ६-३, ६-३, ६-४ असा तीन सेटमध्ये पराभव केला. ऑस्ट्रेलियन ओपनमधील विजेत्या सिन्नरने माद्रिद ओपनमधून माघार घेतली होती. तसेच, रोम मास्टर्स स्पर्धेतही तो मांडीच्या दुखापतीमुळे खेळू शकला नव्हता. रोलँड गॅरोसवर मात्र त्याने यशस्वी पुनरागमन केले आहे.

## ना गंभीर.. ना अय्यर.. मुंबईचा दिग्गज खेळाडू ठरला

# कोलकाताचा किंगमेकर





**। कोलकाता । वृत्तसंस्था ।**

**कोलकाताने तिसरी ट्रॉफी जिंकून त्यांच्यावर जगभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कोलकाताच्या विजयात मेंटर गौतम गंभीरचा मोठा वाटा आहे. याचे श्रेयही त्याला दिले जात आहे. याशिवाय श्रेयस अय्यरनेही अप्रतिम कर्णधारपद केले आहे. पण गौतम गंभीर आणि श्रेयस अय्यर यांनी कोलकाताला ट्रॉफी मिळवून दिली असली तरी पडद्यामागील मुंबईच्या दिग्गज खेळाडूचेही योगदान महत्वाचे आहे.**

कोलकाताच्या विजयात सहाय्यक प्रशिक्षक अभिषेक नायरचा मोठा वाटा आहे. अभिषेक नायर कोलकाताचा प्रमुख चेहरा कधीच बनला नसला तरीपण त्याने ज्या पद्धतीने हा संघ तयार केला आहे ते कौतुकास्पद आहे. कोलकाताला १० वर्षांनंतर आयपीएलमध्ये ट्रॉफी जिंकण्याची संधी मिळाली आहे. या विजयानंतर कोलकाताचे स्टार खेळाडू वरुण चक्रवर्ती आणि व्यंकटेश अय्यर यांनीही अभिषेक नायरचा उल्लेख केला आहे. या संघाला फलंदाजी प्रशिक्षक म्हणून तयार करण्यात अभिषेक नायरने महत्त्वाची भूमिका कशी बजावली, हे त्यांनी सांगितले. अभिषेक नायर सुमारे ४ वर्षांपूर्वी कोलकातामध्ये सामील झाला आणि तेव्हापासून तो संघ तयार करण्यासाठी कठोर परिश्रम घेत आहे.

या विजयानंतर वरुण चक्रवर्ती म्हणाला की, अभिषेक नायरने कोलकातामध्ये भारतीय खेळाडूंचा मजबूत गाभा तयार करण्यात सर्वात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. याशिवाय अभिषेक नायरमुळे माझ्या फलंदाजीत सुधारणा झाल्याचेही व्यंकटेश अय्यरने सांगितले.

अभिषेक नायर ही अशी व्यक्ती आहे ज्याने अनेक खेळाडूंचे करिअर उंचावण्यास मदत केली आहे. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा, दिनेश कार्तिक आणि श्रेयस अय्यर यांनीही फलंदाजी सुधारण्याचे श्रेय अभिषेक नायरला दिले आहे. रिंकू सिंगनेही आपल्या कामगिरीने सर्वांना आश्चर्यचकित केले आहे, त्याने याचे श्रेयही अभिषेक नायरला दिले आहे. याच कारणामुळे पडद्यामागे मेहनत घेऊन संघाला तयार करणाऱ्या अभिषेक नायरला कोलकाताचा किंग मेकर म्हटले जात आहे.

## पीव्ही सिंधूचा पराभव



**मलेशिया** : मलेशिया मास्टर्स २०२४ महिला एकेरीच्या फायनलमध्ये दुहेरी ऑलिम्पिक पदक विजेती पी.व्ही. सिंधूला चीनच्या वांग झियाकडून पराभव पत्करावा लागला. भारतीय शटलर्सनी पहिल्या गेममध्ये २१-१६ असा विजय मिळवून अंतिम फेरीची सुरुवात केली. पहिला गेम गमावल्यानंतर चीनच्या शटलर्सने चमकदार कामगिरी केली. चीनच्या शटलर्सनी पुनरागमन करत २१-५ असा विजय मिळवला. सिंधूने शेवटच्या गेममध्ये वर्चस्व दाखवत ११-३ अशी आघाडी घेतली. तथापि, वांगने शानदार पुनरागमन केले आणि गेम १६-२१ असा जिंकला.

## अलिबागच्या रुद्रा पिळणकरची सुवर्ण कामगिरी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**



अलिबागच्या रुद्रा विनय पिळणकरने लाठी स्पर्धेत सुवर्ण कामगिरी केली आहे. देशासाठी तिने दोन सुवर्ण व दोन रौप्य पदक मिळविले. तिच्या या कामगिरीबद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

गोवा येथे २६ मे रोजी दुसरी दक्षिण एशियायी लाठी स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत अलिबागसह रायगड जिल्ह्यातील अनेक मुले, मुली सहभागी झाले होते. अलिबागमधील पाच वर्षाच्या रुद्रा विनय पिळणकर हीने २ सुवर्ण व २ रौप्य पदक पटकावून अलिबागचे व देशाचे नाव उंचावले आहे. लाठी स्पर्धेतील एकम लाठी प्रकारात १ सुवर्ण पदक, पंचम लाठी प्रकारात १ सुवर्ण पदक असे दोन तसेच अनिखम प्रकारात १ रौप्य पदक आणि लाठी प्रकारत १ रौप्य पदक मिळवून नेत्रदिपक कामगीरी बजावली.

अलिबाग येथील के.ई.एस. इंग्लिश मिडिअम स्कूलमधील रुद्रा विद्यार्थीनी आहे. रुद्राला या खेळासाठी प्रशिक्षक प्रियंका गुजांळ, शुभम नखाते, वेदांत सुर्वे, सिद्धार्थ पाटील यांचे मोलाचे प्रशिक्षण लाभले. तसेच, पालकांकडूनदेखील चांगले प्रोत्साहन मिळाले. रुद्राच्या या कामगिरीबद्दल लाठी असोशिएशन अलिबाग रायगड संघटनेच्यावतीने तिचे अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# अशी असेल भारताची बेस्ट इलेव्हन



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अगामी टी-२० विश्वचषकाला २ जूनपासून सुरुवात होणार आहे. आणि भारतीय संघ ५ जूनपासून आपल्या मोहिमेला सुरुवात करणार आहे. पहिल्या सामन्यात भारतीय संघ आयर्लंडशी भिडणार आहे. हा सामना न्यूयॉर्कमधील नासाऊ काउंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे. यानंतर मेन इन ब्लूचा सामना ९ जूनला कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी होणार आहे. पण भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा कोणत्या संघासोबत मैदानात उतरणार हा एक मोठा प्रश्न आहे. कारण शुभमन गिल आणि केएल राहुलचा संघात समावेश केला नाही. याशिवाय रिंकू सिंगलाही संघात स्थान देण्यात आले नाही. दुसरीकडे, हार्दिक पांड्या अत्यंत खराब फॉर्ममध्ये झगडत असूनही त्याला विश्वचषकाच्या संघाचा भाग बनवण्यात आले आहे. त्यामुळे या विश्वचषक स्पर्धेसाठी भारताचे परफेक्ट प्लेइंग ११ कोणते असू शकतात हे पाहणे महत्वाचे ठरेल.

टी-२० विश्वचषकामध्ये विराट कोहली रोहित शर्मासोबत डावाची सुरुवात करू शकतो. तसेच, सूर्यकुमार यादवला तिसऱ्या क्रमांकावर संधी दिली जाऊ शकते. यष्टिरक्षक फलंदाजाला चौथ्या क्रमांकावर संधी मिळू शकते. ज्यामध्ये संजू सॅमसन आणि ऋषभ पंतच्या रूपाने २ यष्टीरक्षकांचा समावेश आहे. पाचव्या क्रमांकावर शिवम दुबेवर सट्टा खेळू शकते. तर, रोहित शर्मा रवींद्र जडेजा आणि हार्दिक पांड्या या २ अष्टपैलू खेळाडूंना संघात सामील करू शकतो. तसेच, भारतीय संघाचा फिरकीपटू म्हणून कुलदीप यादव व युझवेंद्र चहल या जोडीवर अवलंबून राहू शकतो. वेगवान गोलंदाजीची कमान जसप्रीत बुमराहच्या हाती असेल. मोहम्मद सिराज त्याला साथ देऊ शकतो.

## तुमचा अभिमान वाटतो..

# काव्या मारनने केले संघाचे कौतुक



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

कोलकाताने आयपीएलचे रविवारी (दि.२६) विजेतेपद पटकावले. कोलकाताने अंतिम सामन्यात हैदराबादला ८ गडी राखून पराभूत केले, त्यामुळे हैदराबादला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. या पराभवानंतर हैदराबादचा संघ निराश झाला होता. पण असे असले तरी संघाची सहसंघमालकीण आणि सीईओ काव्या मारनने संघाचे मनोबल वाढवत त्यांचे कौतुक केले आहे.

अंतिम सामन्यात कोलकाता विरूद्ध हैदराबाद संघ पराभूत झाला असताना संघमालकीण काव्या अत्यंत निराश झाली होती. पण तिने ही निराशा लपवत संघाचे कौतुक केले होते. ती ड्रेसिंग रुममध्ये म्हणाली, तुमचा आम्हाला खूप अभिमान आहे. मी इथे हे सांगायला आली आहे की, आपण ज्याप्रकारे क्रिकेट खेळलो, त्याने आपण टी-२० ला एक नवी ओळख मिळवून दिली. सर्वजण त्याबद्दल बोलत आहेत. एखादा दिवस वाईट असतो आणि तो आज होता. पण खरंच तुम्ही फलंदाजी आणि गोलंदाजी, सर्वच क्षेत्रात चांगली कामगिरी केली. जरी आपण गेल्यावर्षी गुणतालीकेत शेवटी राहिलो असलो, तरी यावेळी आपल्याला पाठिंबा देण्यासाठी अनेक चाहते आले. जरी कोलकाता जिंकली असली तरी आपण ज्याप्रकारे क्रिकेट खेळलो, त्याबद्दल सर्वजण बोलत आहेत. काळजी घ्या आणि थँक्यू. निराश होऊ नका, आपण अंतिम सामना खेळलोय. सर्व संघ आपल्याला पाहात होते.

# टी-२० विश्वचषकाचा थरार सुरू

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अगामी टी-२० विश्वचषकाची मुख्य स्पर्धा १ जूनपासून सुरू होणार आहे. त्याचबरोबर टी-२० विश्वचषकाचे सराव सामने सुरू झाले आहेत. अमेरिका, त्रिनिदाद आणि टोबॅगोध्ये २७ मे ते १ जून या कालावधीत सराव सामने खेळवले जाणार आहेत. विश्वचषकापूर्वी एकूण १६ सराव सामने होणार आहेत. सराव सामन्यांच्या पहिल्या दिवशी एकूण ३ सामने खेळले गेले. या सामन्यांमध्ये कॅनडा, ओमान आणि नामिबियाचे संघ विजयी झाले. यावेळी सराव सामन्यांच्या पहिल्या दिवशी कॅनडाचा सामना नेपाळशी झाला. जो टेक्सासमधील ग्रँड प्रेरी क्रिकेट स्टेडियमवर खेळला गेला. तर, त्रिनिदाद आणि टोबॅगो येथे ओमान आणि पापुआ न्यू गिनी यांच्यातील सामना खेळला गेला. त्याचवेळी, दिवसाचा तिसरा सामना त्याच मैदानावर नामिबिया आणि युगांडा संघांमध्ये झाला. कॅनडाने नेपाळविरुद्धचा सामना एकतर्फी ६३ धावांनी जिंकला. दुसरीकडे ओमानने पापुआ न्यू गिनीचा ३ गडी राखून पराभव केला. याशिवाय युगांडाला नामिबियाविरुद्ध ५ गडी राखून पराभव स्वीकारावा लागला.

# जय बजरंगने पटकावले विजेतेपद

**। खांब । वार्ताहर ।**



अलिबाग तालुक्यातील झिराड येथे जिल्हस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कबड्डी स्पर्धेत रोह्यातील नामवंत जय बजरंग रोहा कबड्डी संघाने अंतिम सामन्यात सर्वोत्तम खेळ करून विजेतेपद पटकावून चषकावर आपले नाव कोरले.

झिराडच्या साई क्रीडा मंडळाच्यावतीने नुकतीच रायगड जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा संपन्न करण्यात आली. यावेळी जिल्ह्यातील ३२ संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. भव्यदिव्य अशा या कबड्डी स्पर्धेत रोहा तालुक्यातील जय बजरंग रोहा या संघाने अंतिम विजेतेपद पटकावले. त्यांना रोख रक्कम १ लाख २५ हजार रुपये व आकर्षक चषक असे पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. तसेच, संघातील अष्टपैलू खेळाडू म्हणून राकेश गायकवाड याला स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडूचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेत संघातील सर्व खेळाडूंनी चांगला खेळ करून सांघिक रित्या हा विजय मिळवला. संघ मालक तथा मार्गदर्शक अमर सलागरे यांनी या विजयाबद्दल संघाचे अभिनंदन केले.

# ऑस्ट्रेलिया विरूद्धचे वेळापत्रक जाहीर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

बॉर्डर-गावसकर चषकापूर्वी ऑस्ट्रेलिया 'अ' आणि भारत 'अ' यांच्यात दोन सामन्यांची चार दिवसीय मालिका होणार आहे. या मालिकेतील पहिला सामना ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर दरम्यान मॅके येथील ग्रेट बॅरियर रीफ एरिना येथे खेळवला जाईल. तर, दुसरा सामना एमसीजीमध्ये ७ ते १० नोव्हेंबर दरम्यान होणार आहे. यानंतर, पर्थमधील ऑप्टस स्टेडियमवर २२ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या पहिल्या कसोटीपूर्वी भारतीय संघाच्या मुख्य संघातील खेळाडू आणि 'अ' संघाच्या खेळाडूंमध्ये इंट्रा स्कॉड सामना होईल.



हा सामना १५ ते १७ नोव्हेंबर दरम्यान वाका येथे खेळवला जाईल. दरम्यान, भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दुसऱ्या कसोटीतील एक दिवस-रात्र कसोटी सामनाही होणार आहे.

### कसोटी मालिकेचे वेळापत्रक

**पहिली कसोटी- २२ ते २६ नोव्हेंबर, पर्थ.**
**दुसरी कसोटी- ६ ते १० डिसेंबर, अॅडलेड.**
**तिसरी कसोटी- १४ ते १८ डिसेंबर, गाब्बा.**
**चौथी कसोटी- २६ ते ३० डिसेंबर, मेलबर्न.**
**पाचवी कसोटी- ३ ते ७ जानेवारी, सिडनी.**

# लाल मातीचा बादशाह पराभूत

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

**लाल मातीचा बादशहा असे सामाज्र निर्माण करणाऱ्या राफेल नदालला यंदाच्या फ्रेंच ओपन स्पर्धेत पहिल्याच फेरीत बाद व्हावे लागले. त्याने दुखापतीनंतर पुनरागमन केले असले तरी ही त्याची अखेरची फ्रेंच ओपन असल्याचेही बोलले जात आहे. अनेक दुखापतींचा सामना करत नदालने जिद्दीने यंदा फ्रेंच स्पर्धेत खेळण्याचा निर्णय घेतला खरा; परंतु चौथ्या मानांकित अलेक्झँडर झ्वेरेवचा अडथळा तो पार करू शकला नाही. झ्वेरेवने हा सामना ६-३, ७-६ (७-५) ६-३ असा पराभव केला.**

### ११६ सामन्यांत केवळ चौथ्यांदा पराभव



या फ्रेंच ओपन स्पर्धेत राफेल नदालने सर्वाधिक १४ वेळा विजेतेपद मिळवलेले आहे. गतवर्षी तो दुखापतीमुळे सहभागी झाला नव्हता. राफेल नदालसाठी ही लढत सोपी नसणार हे उघड होते. एरवी या स्पर्धेत बादशहाप्रमाणे वावरणाऱ्या राफेल नदालचा आत्मविश्वास काहीसा कमी वाटत होता. पहिला सेट सहज गमावला असला तरी या कोर्टवर अशा पिछाडीनंतर त्याने अनेक सामने आणि विजेतेपदही मिळवलेले आहे. दुसऱ्या सेटमध्ये त्याने आपला सर्व अनुभव पणास लावला. ५-५ बरोबरी साधत हा सेट पुढे टायब्रेकरवर नेला; परंतु तेथे त्याची लढत थोडक्यात कमी पडली. त्यानंतर राफेल नदाल पाठीमागेच पडत गेला. नदालच्या तुलनेत झ्वेरेवचे पहिल्या सर्व्हिसवर चांगले नियंत्रण होते. त्याच्या पहिल्या आणि दुसऱ्या सर्व्हिसचा वेगही अधिक होता. तसेच, ब्रेक पॉईंटचे रूपांतर यशामध्ये करण्यात तो ३३% : १८% इतका पुढे होता. त्याचे विनर्सही ४४:३३ असे होते. राफेल नदालसाठी मैदानी फटके मात्र अफलातून होते; परंतु ते त्याला विजय मिळवून देण्यास पुरेसे ठरले नाहीत.

### पराभवानंतर नदाल झाला भावुक

**दरम्यान, १४ वेळा फ्रेंच ओपन जिंकणारा नदाल पराभवानंतर भावुक झाला होता. सामन्यानंतर बोलताना नदाल म्हणाला, माझ्यासाठी व्यक्त होणे कठीण आहे. मला माहित नाही की हे शेवटचे आहे की नाही, मी पुन्हा खरंच तुमच्या सर्वांसमोर असेल की नाही. मला याची १०० टक्के खात्री नाही. पण जर हे शेवटचे असेल, तर मी त्याचा आनंद घेतला. मी तयारी करताना मला प्रेक्षकांकडून गेल्या आठवडाभरात खूप चांगला पाठिंबा मिळाला. आता ज्या काही भावना उंचबळून आल्यात त्यांना शब्दात मांडणे कठीण आहे. पण लोकांचे प्रेम माझ्यासाठी स्पेशल आहे.**

### लाल मातीचा बादशाह

**नदालला लाल मातीचा बादशाह असे म्हटले जाते. कारण त्याने तब्बल १४ वेळा फ्रेंच ओपन स्पर्धा जिंकली आहे. झ्वेरेवविरुद्धचा त्याचा या स्पर्धेतील ११६ वा सामना होता. विशेष म्हणजे या ११६ सामन्यात त्याने केवळ चौथ्यांदा पराभव स्विकारला. तसेच, नदालला फ्रेंच ओपनमध्ये पराभूत करणारा झ्वेरेव केवळ तिसरा टेनिसपटू आहे. यापूर्वी त्याला दोन वेळा नोवाक जोकोविच आणि एक वेळा रॉबिन सॉडर्लिंगने पराभूत केले आहे.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)